University of Mumbai

# संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका

(Peer-Reviewed Research Journal)

वर्ष ०२ ❖ अंक ०२

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२१

# संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका (Peer-Reviewed Research Journal)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९व्या जयंतीचे (१४ एप्रिल २०२०) औचित्य साधून अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा, मुंबई विद्यापीठ यांच्या कल्पनेतून 'संभाषण' या द्विभाषिक (इंग्रजी आणि मराठी) ऑनलाईन संशोधनपत्रिकेचा जन्म झाला. विभिन्न विद्याशाखांमध्ये समकालीन प्रश्नांबाबतच्या चिकित्सक चर्चेला गतिमान करणे आणि विचारमंथनाद्वारे संवाद प्रस्थापित करणे या भूमिकेचे अधिष्ठान 'संभाषण' संशोधनपत्रिकेच्या मुळाशी कार्यरत असलेले दिसते.

'कोरोना' हा विषय केंद्रस्थानी असलेले 'संभाषण'चे तीन अंक प्रकाशित झाले आहेत. तसेच अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून 'संभाषण'चा ऑगस्ट महिन्याचा अंक 'अण्णा भाऊ साठे विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून या विशेषांकाचे भरभरून स्वागत झाले. तसेच विविध अभ्यासशाखेतील अभ्यासकांनीही सदर विशेषांकाचे संदर्भमूल्य मान्य केले, ही अत्यंत आश्वासक बाब आहे.

'संभाषण'च्या माध्यमातून इंग्रजी आणि मराठी असा द्विभाषिक संशोधनपत्रिकेचा एकत्रित सुरू झालेला प्रवास अत्यंत आनंददायी आणि प्रेरणादायी होता. मात्र काही तांत्रिक कारणांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेतील संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित होणे अपरिहार्य ठरले. तसेच मुंबई विद्यापीठ हे महाराष्ट्रातील सर्वात जुने विद्यापीठ असल्यामुळे राज्यभाषेतून ज्ञानव्यवहार आणि संशोधनव्यवहाराला चालना देण्याचा मुद्दाही अग्रक्रमाने पुढे आला. याला अनुसरूनच मराठी भाषेतील आंतरविद्याशाखीय संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित व्हावी असा प्रस्ताव विद्यापीठाने ठेवला. हा प्रस्ताव अनेक अर्थांनी महत्त्वाचा असल्यामुळे सप्टेंबर २०२०पासून 'संभाषित' या नावाने मराठी संशोधनपत्रिकेची स्वतंत्र वाटचाल सुरू झाली आहे.

# ‘संभाषित’ची रूपरेषा

- सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध स्तरांतील महत्त्वपूर्ण प्रश्न आणि घडामोडींविषयी आंतरज्ञानशाखीय दृष्टिकोणातून सिद्ध होणारी मांडणी पुढे येण्यासाठी अभ्यासक/ संशोधकांना खुला मंच उपलब्ध करून देणे ही ‘संभाषित’ची मूलभूत भूमिका आहे.

- संशोधन आणि संशोधनात्मक लेखन हे अंतिमत: समाजासाठीच आहे. त्यामुळे या लेखनाचा एक गृहीत पैलू हा सामाजिकता आहे, या बांधिलकीतून सैद्धांतिक आणि कृतिशील अशा दोन्ही स्तरांवर काम करणाऱ्या अभ्यासक / संशोधकांचे लेखन समाजाच्या विविध स्तरापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच विविध सामाजिक स्तरांमधील वाचकाची अभिरुची आणि वैचारिक जडणघडण सकस होण्यासाठी आवश्यक असणारा अवकाश सिद्ध करण्याची प्रेरणा ‘संभाषित’च्या मुळाशी कृतिशील आहे.

- भारताच्या बरोबरीने भारताबाहेरील मराठी भाषिक अभ्यासक / संशोधकाच्या परिदृष्टीतून जागतिक आणि भारतीय अवकाशातील विविध प्रश्नांविषयीची विश्लेषक मांडणी समाविष्ट करून घेण्यासाठी प्रयत्न करणे, हे ‘संभाषित’चे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

- संशोधनपर, भाष्यपर आणि पुस्तक परीक्षणपर असे तीन विभाग ‘संभाषित’मध्ये अंतर्भूत आहेत. या विभागांत समाविष्ट होणारे लेख सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रांशी संबंधित असल्यामुळे ही संशोधनपत्रिका समाजाच्या विविध स्तरांशी आपला वैचारिक अन्वय जोडेल, असा विश्वास आहे.

- मानव्यविद्याशाखेतील विविध अभ्यासविषयांशी निगडित सैद्धांतिक विवेचन करणाऱ्या लेखांच्या बरोबरीने समाजजीवनातील अनेकस्तरीय संदर्भांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करणाऱ्या लेखांचाही समावेश सदर संशोधनपत्रिकेत केला जाणार आहे. स्वाभाविकच, विविध अभ्यासविषयांशी संबंधित नवनवी सिद्धांतने मराठी भाषेतून पुढे आणणारा हा अतिशय महत्त्वाचा अकादमिक मंच ठरू शकेल.

# शोधनिबंधांसंदर्भातील मार्गदर्शक सूचना

- लेख स्वतंत्र संशोधनावर आधारित असावेत.

- लेखांची शब्दमर्यादा साधारण पुढीलप्रमाणे असेल.
  शोधनिबंध - ३५००-४००० शब्द
  भाष्य - १५००-२००० शब्द
  ग्रंथपरीक्षण - १०००-१२०० शब्द

- शोधनिबंध देवनागरी लिपीमध्ये युनिकोड फॉन्टमध्ये असावेत.
  फॉन्टचा आकार साधारणपणे १२ ते १४ बिंदूमध्ये (point) असावा.

- संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना अंकाच्या शेवटी नोंदविल्या आहेत. लेखात संदर्भ देताना या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

- संशोधनपर लेख विषयतज्ज्ञांच्या सकारात्मक अभिप्रायानंतरच अंकात समाविष्ट केले जातात.

- लेख editorinchief.sambhashit@mu.ac.in व editor.sambhashit@mu.ac.in या दोन्ही मेलवर पाठवावेत.

## प्रकाशक

***अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय, मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस, विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.***

ही संशोधनपत्रिका समाजविज्ञान, मानव्यविद्याशाखा आणि विधी या विद्याशाखांमधील सद्य:कालीन प्रश्नांना आंतरविद्याशाखीय दृष्टिकोणातून भिडणाऱ्या अभिनव आणि टीकात्मक निबंधांचा स्वीकार करते.

"मानसिक स्वातंत्र्य कोणाला आहे असे म्हणता येईल? जो आपली बुद्धी जागृत ठेवून आपले हक्क काय, आपले अधिकार काय व आपले कर्तव्य काय यांची जाणीव करून घेतो त्याला मी स्वतंत्र म्हणतो. जो परिस्थितीचा दास झाला नाही, जो परिस्थितीला आपल्या कह्यात आणण्यास सिद्ध असतो, तो माणूस स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो रूढीच्या स्वाधीन झाला नाही, जो गतानुगतिक बनला नाही,ज्याच्या विचाराची ज्योत विझली नाही तो स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो पराधीन झाला नाही, जो दुसऱ्याच्या शिकवणीने वागत नाही, जो कार्यकारणभाव ध्यानात घेतल्याशिवाय कशावर विश्वास ठेवित नाही, जो आपल्या हक्कांचा अपहार केला असता, त्याच्या रक्षणार्थ दक्ष असतो, जो प्रतिकूल लोकमताला घाबरून जात नाही, दुसऱ्याच्या हातचे बाहुले न होण्याइतकी बुद्धी, स्वाभिमान ज्याला आहे तोच माणूस स्वतंत्र आहे, असे मी समजतो. जो आपल्या आयुष्याचे ध्येय व आपल्या आयुष्याचा व्यय दुसऱ्याने घालून दिलेल्या आज्ञेप्रमाणे ठरवित नाही, जो आपल्या बुद्धीनुसार आपल्या आयुष्याचे ध्येय काय असावे व आपले आयुष्य कोणत्या कार्यात व कशारीतीने व्यतीत करावे हे आपले आपण ठरवितो, सारांश जो सर्वस्वी स्वाधीन आहे, तोच माणूस स्वतंत्र आहे,असे मी समजतो."

**-डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

(डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८,भाग १, पृ. ५०६)

# संपादकीय मंडळ

मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांचा '**संभाषित**' ई- नियतकालिकाला असलेला आश्वासक पाठिंबा आणि सहकार्य यासाठी आम्ही आदरपूर्वक आभार मानतो.


**मुख्य संपादक** : **डॉ. राजेश खरात**
अधिष्ठाता, मानव्यविद्या शाखा
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**सल्लागार संपादक** : **डॉ. नीतिन आरेकर**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
श्रीमती चांदीबाई हिम्मतलाल मनसुखानी महाविद्यालय,
उल्हासनगर.

**संपादक** : **डॉ. शीतल पावसकर-भोसले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सेवा सदनचे आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर.

**सहसंपादक** : **डॉ. नीतीन रिंढे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
चेतनाचे श्रीमती कुसुमताई चौधरी कला महाविद्यालय,
वांद्रे (पूर्व), मुंबई.

**डॉ. मंगेश बनसोड**
सहयोगी प्राध्यापक, अकॅडमी ऑफ थिएटर आर्ट्स
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**परीक्षण संपादक** : **डॉ. अश्विनी तोरणे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
डॉ. टी. के. टोपे रात्र महाविद्यालय, परळ, मुंबई.

**साहाय्यक संपादक** : **डॉ. अनंत लोखंडे**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

**प्रा. आशा हुंबे-पडळकर**
व्याख्याता, मराठी विभाग
भवन्स (कनिष्ठ) महाविद्यालय, अंधेरी, मुंबई.

**डॉ. नारायण गडदे**
साहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. नारायण भोसले**
साहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. प्रतिभा टेंबे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
आदर्श कला, वाणिज्य महाविद्यालय, कुळगांव,
बदलापूर.

**डॉ. माधुरी पाथरकर**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

**डॉ. लता पांचाळ**
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
कल्याण, जि. ठाणे.

**प्रा. संजय इंगोले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
एल.जी.एम. महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी.

**डॉ. सुनील अभिमान अवचार**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. सोनाली वाखरडे**
साहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. विवेक कुडू**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सोनोपंत दांडेकर कला महाविद्यालय, पालघर

मांडणी व सजावट : **प्रशांत पांचाळ**
ग्राफिक डिझायनर, कल्याण, जि. ठाणे.

तांत्रिक साहाय्य : **डॉ. लता पांचाळ**

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी मुंबई विद्यापीठ, संपादक, संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.

संग्रामित

# संपादकीय

'मुंबई प्रांत आणि इलाख्या'स शतकांपासून शैक्षणिक परंपरेचा आणि आर्थिक भरभराटीचा लाभलेला वारसा सर्वश्रुत आहे. मुंबईच्या शीर्षस्थानी असलेल्या दोन उत्तुंग इमारती; एकीकडे दलाल स्ट्रीटवरील 'द फिरोज जीजीभॉय टॉवर', जे आज 'मुंबई शेअर मार्केट' म्हणून प्रसिद्ध आहे तर दुसऱ्या बाजूला महात्मा गांधी मार्गावरील 'राजाबाई टॉवर' म्हणजेच 'मुंबई विद्यापीठ!' दोन्ही इमारती तशा निर्जीव असल्या तरी त्या ठिकाणी होत असणारी देवाण-घेवाण ही एवढी जिवंत आणि सजीव आहे की कधी काळी या इमारतींतून ज्या दिवशी बौद्धिक आणि आर्थिक व्यवहार सुरू झाले आहेत तेव्हापासून ते आजतागायत कधी थांबलेलेच नाहीत, असे वाटते. फरक एवढाच आहे की शेअर मार्केटमधील व्यवहार हे बंद तावदानातील आर्थिक स्वरूपाचे असून ज्यांच्याकडे आर्थिक सुबत्ता आहे त्यांच्यासाठी मर्यादित आहेत तर नेमकी याउलट परिस्थिती राजाबाई टॉवरची आहे. येथे सर्वसामान्य जनतेसाठी केव्हाही उपलब्ध असणारे वैचारिक आणि बौद्धिक देवाणघेवाणीचे स्त्रोत आहेत. येथील ज्ञानाचे सार सातासमुद्रापलीकडे पोहोचले आणि तेथून येथपर्यंत आलेदेखील! अशा या वैचारिक परंपरेची पार्श्वभूमी असलेल्या या मुंबई शहर आणि विद्यापीठाने भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची पायाभरणी सन १८५८ पासून केली ती थेट सन १९४२च्या 'चले-जाव' आंदोलनापर्यंत.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाचे १९४२ हे साल आणि मुंबई व मुंबई विद्यापीठ यांचे असे अतूट नाते आहे. १८५८ ते १९४२ चा काळ मुंबई विद्यापीठासाठी सुवर्णाक्षरांनी लिहिला जावा असाच आहे. मुंबई विद्यापीठातील आणि विद्यापीठाशी संलग्नित अनेक मान्यवरांनी विद्यापीठाच्या माध्यमातून भारत आणि सभोवतालच्या देशांतील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक घडामोडींचे विश्लेषण आणि भाष्य करून भारताच्या स्वातंत्र्याविषयी सर्वसामान्य लोकांमध्ये चेतना जागविण्याचे काम केलेले आहे. सर फिरोजशहा मेहता आणि त्यांच्या तत्कालीन सहकाऱ्यांनी विविध वर्तमानपत्रे आणि नियतकालिकांमधून सतत लिहून हे कार्य सुरू ठेवले. परिणामी, स्वातंत्र्यपूर्व काळातील मुंबई प्रांतातील आघाडीच्या वर्तमानपत्रांचे, नियतकालिकांचे जनक हे बहुतांशी मुंबई विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळातदेखील हीच परंपरा जोपासण्यात आली. स्वतंत्रपणे केवळ मुंबई विद्यापीठाचा विचार केल्यास एकीकडे डॉ. उषा मेहता यांनी 'कम्युनिटी रेडिओ'च्या माध्यमातून संदेशवहनाचे महत्त्वपूर्ण कार्य १९४२ च्या आंदोलनात केले तर दुसरीकडे प्रख्यात समाजशास्त्रज्ञ प्रा. गोविंद सदाशिव घुर्ये यांनी १९२४ पासून 'समाजशास्त्र विभागा'च्या प्रमुख पदाची धुरा सांभाळत असताना १९३२पासून समाजात जनजागृती करण्यासाठी विपुल लेखन करून याच विद्यापीठातून ते प्रकाशितदेखील केले. याचा दाखला द्यायचा तर, घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९४४ मध्ये श्री. यु. टी. ठाकूर यांनी अखंड भारतातील सिंधी समाजावरचे संशोधन असणारा पहिला प्रबंध 'सिंधींच्या सामाजिक संस्था' हा मुंबई विद्यापीठात सादर केला. त्याकाळी फाळणीपूर्व सिंध प्रांतातील कराचीसह अनेक महाविद्यालये मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीत असल्याने या विषयाचा अभ्यास करण्यासाठी ठाकूर यांनी अनेक महिने कराचीत राहून हा प्रबंध लिहिला होता. त्यामुळे या प्रबंधाचे महत्त्व अधोरेखित होते. फाळणीनंतर मात्र याच सिंधी समाजाची फरफट आणि ससेहोलपट प्रा. घुर्ये यांच्यातील संवेदनशील समाजमनाला स्वस्थ बसू देईना. रातोरात स्थलांतर झाल्याने आणि अस्थायी पुनर्वसनामुळे 'ना घर का! ना घाट का!' अशा अवस्थेतून सिंधी समाज जात होता. कराचीपासून मुंबई जवळ असल्याने सिंधी निर्वासितांचा जत्था मुंबईत बऱ्यापैकी दाखल झाला होता. अशा आणीबाणीच्या प्रसंगी सिंधी समाजाची होणारी हेळसांड शब्दबद्ध करण्यासाठी त्यांनी श्री. ठाकूर यांच्याकडून सिंधी संस्कृती हे पुस्तक लिहून घेतले आणि 'मुंबई विद्यापीठाच्या प्रिंटिंग प्रेस'मधून मार्च १९५९ मध्ये प्रकाशित केले. उल्लेखनीय बाब म्हणजे आजही सिंधी संस्कृतीवर कोणाला संशोधन करायचे असेल तर त्यास मुंबई विद्यापीठातून प्रकाशित झालेल्या या संदर्भग्रंथाचा आधार घ्यावा लागतो. कदाचित प्रा. घुर्ये यांच्याच प्रयत्नातून मुंबई विद्यापीठात 'सिंधी भाषा आणि संस्कृती' शिकण्यासाठी एक स्वतंत्र विभाग सुरू झाला आणि भारतात 'मुंबई विद्यापीठ' हे एकमात्र विद्यापीठ आहे जेथे 'सिंधी विभाग' आजही कार्यान्वित आहे. ही गोष्ट विद्यापीठासाठी निश्चितच अभिमानास्पद आहे. हीच परंपरा १९६० ते १९७० च्या दशकात मुंबई विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू पी. गजेंद्रगडकर यांच्यापर्यंत पाहायला

संपादकीय

मिळते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू तसेच एक वकील, न्यायाधीश म्हणून त्यांनी काश्मीरसारख्या क्लिष्ट आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील विषयावर वेळोवेळी आपली मते स्पष्टपणे मांडून त्यांच्या व्याख्यानांचे एक पुस्तकच मुंबई विद्यापीठाच्या प्रकाशन विभागातून प्रकाशित केले. त्याचप्रमाणे पद्मभूषण डॉ. माधव सदाशिव गोरे यांनी ऐंशीच्या दशकात मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू पदावर असताना सामाजिक विषमता, शेतकऱ्यांची अवस्था, महात्मा फुले आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यावर लिखाण केले. पुढे त्यांनी दिल्लीतील 'जवाहरलाल नेहरू विद्यापीठा'चे कुलपती असतानादेखील 'सामाजिक न्याय' या विषयाला अनुसरून निरंतर लिखाण केले; हेही मुंबई विद्यापीठासाठी भूषणावह आहे. अशा अनेक उपक्रमांची यादी लांबलचक आहे. वानगीदाखल उल्लेख केलेल्या प्रकाशनांची नोंद आपल्याला अशासाठी घ्यायची आहे की समाजजीवनात अनेक प्रकारच्या सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक उलाढाली होत असतात आणि अशा वेळी सर्वसामान्य माणूस विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन केंद्रे यांच्याकडे केवळ ज्ञानाचे स्तोत्र म्हणून न बघता चिकित्सक बुद्धीने एखाद्या घटनेची नोंद घेऊन त्यावर विविध परिप्रेक्ष्यातून भाष्य करणाऱ्या, समाजाला दिशा देणाऱ्या संस्था म्हणून बघत असतो. समाजाची तशी एक माफक अपेक्षा असते. त्यामुळेच की काय दुसऱ्या महायुद्धानंतर उद्भवलेल्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील संबंधांचा आणि घटनांचा आढावा घेण्यासाठी मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या 'एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे'तर्फे 'युनायटेड एशिया' नावाचे जर्नल १९५० ते १९६० च्या दरम्यान प्रकाशित होत असे. अलिप्ततावादी चळवळ, भारत-चीन सबंध अशा अनेक घटनांवर आधारित संशोधनात्मक लेख आणि पुस्तके या संस्थेमार्फत प्रसिद्ध होत असत.

मुंबई विद्यापीठाच्या याच समृद्ध बौद्धिक आणि शैक्षणिक संस्कृतीचा वारसा जपत आणि त्यापासून प्रेरणा घेत मुंबई विद्यापीठाच्या 'मानव्यविद्या शाखे'च्या अधिष्ठाता कार्यालयाने मुंबई विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयात कार्यरत आणि आपल्या शैक्षणिक कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या शिक्षक, संशोधकांना आपले विचार व्यक्त होण्यासाठी हक्काचे माध्यम मिळावे म्हणून संशोधनपत्रिका प्रसिद्ध करण्याचे पाऊल

संपादकीय

उचलले. विद्यापीठातील काही विभागातून काही संशोधनपत्रिका सुरू करण्यात आल्या, पण काही वेळेस त्या विशिष्ट विषयांशीच बांधील असल्याने त्यात सर्वसमावेशकता नव्हती. विद्यापीठीय प्रस्थापित बुद्धिजीवींसाठी अनेक माध्यमे उपलब्ध होती, मात्र महाविद्यालयीन प्राध्यापक आणि संशोधकांसाठी हक्काचे असे विचारपीठ नव्हते. अशावेळी मुंबई विद्यापीठाचा प्रकाशनाचा एवढा मोठा वारसा असताना विद्यापीठातच एखादे जर्नल किंवा प्रकाशन असावे हा विचार अनेक दिवस चालू होता. त्यातच मार्च २०२० नंतर कोविड-काळात अनेकांना आपल्याच घरात नजरबंदीत राहण्याची वेळ आलेली होती. विद्यापीठीय कामकाज ऑनलाईन पद्धतीने सुरू होते. या संकटाचे संधीत रूपांतर करण्याच्या दृष्टीने संशोधनपत्रिकेच्या संपादनाची कल्पना सुचली. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू माननीय प्रा. सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू माननीय प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्यासाठी केलेल्या सहकार्यामुळे मानव्यविद्याशाखेच्या अधिष्ठाता कार्यालयामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल २०२० रोजी सुरुवातीला 'संभाषण' नावाच्या द्विभाषिक संशोधनपत्रिकेची औपचारिक घोषणा केली गेली. पुढे दोन आठवड्यात 'महाराष्ट्र दिना'च्या निमित्ताने १ मे २०२० रोजी 'संभाषण' नामक संशोधनपत्रिकेचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला. कालांतराने इंग्रजी भाषेत 'संभाषण' आणि मराठीत 'संभाषित' असे दोन स्वतंत्र अंक प्रकाशित केले गेले आणि ऑक्टोबर २०२० मध्ये हिंदी भाषेतील 'शोधावरी' नावाची अशी तिसरी संशोधनपत्रिका विद्यापीठाच्या मानव्यविद्या अधिष्ठाता कार्यालयातून सुरू करण्यात आली. तेव्हापासून कोणताही खंड पडू न देता आज तीनही भाषांमधील या संशोधनपत्रिकांचे प्रकाशन होत आहे. मुंबई विद्यापीठ हे भारतातील बहुधा एकमेव विद्यापीठ असावे जेथे तीन भाषेत संशोधनपत्रिका प्रकाशित होत असतील. यासाठी माननीय कुलगरू प्रा. पेडणेकर आणि प्र-कुलगुरू प्रा. कुलकर्णी यांचे सतत मार्गदर्शन आणि सहकार्य लाभत गेले. त्यासाठी अधिष्ठाता कार्यालय आणि तिन्ही संशोधनपत्रिकेचे संपादकीय मंडळ आभारी आहेत.

मराठी ही राज्यभाषा आणि या भूमीतील मातृभाषा असल्याने मराठी भाषेतून प्रकाशित होणाऱ्या 'संभाषित' ही संशोधनपत्रिका अल्पावधीत

लोकप्रिय झाली आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचली. भारत देश आणि देशाबाहेर राहणाऱ्या आणि विविध क्षेत्रांशी निगडित असणाऱ्या मराठी भाषिकांनी खुल्या दिलाने या पत्रिकेचे केवळ स्वागतच केले असे नव्हे तर त्यांनी त्यांच्या क्षेत्राशी, व्यवसायाशी निगडित विषयांवरील आपल्या विचारांना मोकळी वाट करून देण्यासाठी 'संभाषित'ची निवड केली. अशा अनेक महानुभाव लेखकांचे मनापासून आभार! 'संभाषित'च्या संपादकीय मंडळाने केवळ मुंबई विद्यापीठाच्या नावावर आणि त्याच्याशी जोडलेली नाळ तुटू नये म्हणून तन-मन-धन या सर्व पातळीवर योगदान देऊन 'संभाषित'साठी संपूर्णपणे स्वत:ला झोकून दिले आहे, हे विसरता येणार नाही, त्याची भरपाई होणार नाही, हेही तितकेच खरे! केवळ याच ध्यासापोटी प्रारंभीच्या 'संभाषण' मराठी संपादकीय मंडळाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 'जन्मशताब्दी'च्या निमित्ताने त्यांच्या कार्याला समर्पित विशेषांक ऑगस्ट २०२० मध्ये प्रकाशित केला. पुढे हाच अंक ऑगस्ट २०२१मध्ये मुंबईतील 'शब्द प्रकाशना'तर्फे पुस्तक स्वरूपात *लोकशाहीर अण्णाभाऊ साठे : चिंतन आणि पुनर्शोध* या नावाने प्रकाशित करण्यात आला. अशाच प्रकारे आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या १९०व्या जयंतीनिमित्ताने जानेवारी २०२१ रोजी प्रकाशित केलेला 'स्त्रीवादा'वरील विशेषांक सप्टेंबर २०२२ मध्ये पुण्यातील 'हरिती प्रकाशना' तर्फे *स्त्रीवाद: बहुआयामी चर्चाविश्व* या नावाने पुस्तकरूपात आणला. अशाप्रकारे मुंबई विद्यापीठाच्या परंपरेला साजेसे 'मुक्त चिंतन आणि विचारांना जोपासणाऱ्या समाजातील सर्व क्षेत्रांतील प्रथितयश मान्यवरांबरोबरच नवीन होतकरू तरुणाईलादेखील एक खुले विचारपीठ 'संभाषित'मुळे सहजरित्या उपलब्ध झालेले आहे. अशा विचारपीठाची सुरुवात होत असतानाच त्याची सांगता होते की काय, एवढीच एक खंत आहे.

- राजेश खरात

# शोधनिबंध
# पुस्तक परीक्षण

संशोधन

# अनुक्रम...

## शोधनिबंध

**नदीष्ट : आदिबंधात्मक अवलोकन** १५
वर्षा शिरीष फाटक

**दलित पँथरच्या इतिहासात भर घालणारे पुस्तक : दलित पँथर अधोरेखित सत्य** २९
अविनाश कोल्हे

**भारतामधील दारिद्र्य : संकल्पना, उपाय आणि पर्याय** ४१
कृष्णन गोपाळ नंदेला

## पुस्तक परीक्षण

**जगण्याची चिकित्सा करणारे आत्मकथन : मी असा जगलो** ४९
वासंती दामले

**'नाथपंथी डवरी गोसावी' या वंचित जातीच्या इतिहासाचा अस्सल दस्तऐवज : देशोधडी...** ५८
प्रदीप मोहिते

**जॉर्ज ऑर्वेल यांच्या निवडक निबंधांचा अनुवाद** ६४
दीपक बोरगावे

# शोधनिबंध

# नदीष्ट : आदिबंधात्मक अवलोकन

**वर्षा शिरीष फाटक**

सहयोगी प्राध्यापक व प्रमुख
मराठी विभाग
मु. पो. देवरुख, ता. संगमेश्वर,
जि. रत्नागिरी.

phatakvarsha3@gmail.com

संशोधन

नदीष्ट ही मनोज बोरगावकर यांची कादंबरी २०१९ मध्ये ग्रंथालीने प्रकाशित केली. नदीष्टच्या रूपाने एका नादिष्ट (छंदिष्ट) माणसाचा जीवनप्रवास या कादंबरीत रेखाटला आहे. या कादंबरीचा घाट वैशिष्ट्यपूर्ण अशा प्राक्कथा व अनेक आदिबंधात्मक गुणधर्मांनी बनला आहे. त्यामध्ये जीवनाचे अंत:स्तरीय दर्शन घडविण्याचे व जीवनविषयक सत्यांना स्पर्श करण्याचे सामर्थ्य दिसून येते. या कादंबरीतील मूलभूत व आदिम अशा जीवनजाणिवांचे चित्रण, वैशिष्ट्यपूर्ण पात्रे, आणि गूढरम्य असे वातावरण लक्षात घेतल्यास आदिबंधात्मक समीक्षेच्या अंगाने त्याची उकल करता येते.

या कादंबरीचा प्रारंभ RUMI या सुफी संताच्या विचाराने होतो. "When you do things from your soul, you feel a river moving in you, a joy." (बोरगावकर २०१९ : ११) हा विचार हेच लेखकाच्या जीवनाचे सूत्र आहे. नदी ही जीवनसरिता आहे. ही सरिता मानवातील चैतन्य जागृत ठेवते. ती तिच्या दोन्ही तीरावरील चराचर सृष्टीला 'सुजलाम सुफलाम' करते. इतकेच नव्हे तर मानवजातीच्या कल्याणासाठी असणारी एक शहाणीव तिच्यात आहे. म्हणूनच तिच्या वाहत्या राहण्याशी माणूस भावनिकरित्या जोडला गेला आहे. तो तिच्या अंगाखांद्यावर खेळतच वाढला, घडला आहे. तिच्या दोन्ही दुआबात आदिम काळापासून निर्माण होत गेलेल्या संस्कृतीने त्याचे पिढ्यान्पिढ्या भरणपोषण केले आहे. अर्थातच फार प्राचीन काळापासून मानवाने सर्जनाची शक्ती ज्या स्वरूपात पाहिली त्या रूपाला मातेचे रूप देऊन पूज्य मानले. नदीबद्दलची सर्वसामान्यांची भावना ती 'जन्मजननी'....जन्मजान्हवी' अशी पावित्र्याची असते. ती पालनपोषण करणारी तर आहेच पण अनेकांसाठी ती 'आपल्या भावना 'डम्प' करण्याची जागा' आहे असे लेखकाला वाटते. प्राचीन काळात आर्यांनी तिला 'मातृकाम्या' तृष्णेची पूर्ती करणारी 'महामाता' म्हटले आहे. वेगवेगळ्या संस्कृतीत तिची ओळख सर्जक रूपात आढळते. म्हणूनच लेखक तिला 'लिव्हिंग ऑरगॅनिझम' म्हणतो. संवेदनशील लेखकातील मानव्याच्या खुणा अशा शब्दांतून प्रत्ययास येतात.

**शुभंकर आणि प्रलयंकर पाणी**

मातृरूप पाणी हे एकाच वेळी सर्जनाचे प्रतीक आहे तसेच ते सर्जक अशा स्त्रीत्वाचेही प्रतीक आहे. नदीला माता मानणाऱ्या नदीष्ट या

कादंबरीतील नायकाला लहानपणापासून लाभलेला गोदावरीचा विस्तीर्ण परिसर गूढ आणि आदिमतेने परिपूर्ण असा आहे. तो लहानपणापासूनच अथांग पसरलेल्या गोदामायच्या अंगाखांद्यावर वाढला आहे. जाणत्या वयात तिच्याशी असणारे त्याचे नाते अधिक घट्ट होताना दिसते. तिच्या परिसरात भेटणाऱ्या अनेक सामान्य व्यक्तींमधील असामान्यत्वाची प्रचिती त्याला येते. तो त्यांच्या अधिक जवळ जाऊन त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला अनेक अनाकलनीय जीवनसत्यांचे आकलन होते. एरव्ही सर्वसामान्य कुटुंबवत्सल माणसासारखीच दिनचर्या असणाऱ्या नायकाचा रोज नदीवर येऊन पोहण्याचा परिपाठ कधी चुकत नाही. ३० ते ४० वर्षांच्या त्याच्या व्यासंगात त्याला महानगरीकरणामुळे दूषित होत जाणाऱ्या नदीप्रवाहाची जाणीव होते. उन्हाळ्यात नदीचे सुकत जाणे, कुबट घाणीचे साम्राज्य निर्माण होणे तो पाहातो, वाळूचा सातत्याने होणारा उपसा त्याला, तिच्या गर्भावर होणाऱ्या आघातांसारखा वाटतो. वेगवेगळया ऋतूंमध्ये बदलणारे नदीचे रूप, नदीच्या आजूबाजूला वाढलेल्या दाट झाडीच्या आश्रयाला येणारी चरसृष्टी, यामध्ये नदीकाठच्या विस्तीर्ण चिंचेच्या झाडांवर संचार करणाऱ्या माकडांच्या टोळया, तिच्या आजूबाजूचा गर्द झाडीचा परिसर, हरणांचे कळप, अस्वल, बिबटे यांचा संचार, जलधारांमध्ये थिरकरणारे मोरांचे थवे, नदीचे गर्भगृह, तिच्या काठावरील मंदिर, आणि काठावर भेटणारी विलक्षण माणसं उदाहरणार्थ, सकीनाबीसारखी अत्यंत कुरूप भिकारीण, दारू प्यायला, जुगार खेळायला येणारी टवाळ तरुणांची टोळकी, भिकाजीसारखा अवलिया भिकारी, तृतीयपंथी सगुणा, नवस फेडायला येणारी स्त्री, जनावरांना चरायला आणणारा कालूभैया, मासे पकडायला येणारा पुरभाजी झिंगाभोई, नदीच्या दाट झाडीत नाग सोडायला येणारा सर्पमित्र प्रसाद, दादारावांसारख्या पोहणाऱ्या कुशल मार्गदर्शकापासून ते नवशिक्यांपर्यंत अनेकांची वेगवेगळया प्रहरांत तिच्या तीरी होणारी वर्दळ, एरव्ही या कोलाहलापासून दूर असणारा नदीच्या गर्भातला डोहखोल असा एकांत, त्यात निर्भयपणे तासन्तास पोहणारा नायक आणि या सर्वांना साक्षीभावाने समजून घेत त्याने मांडलेले त्यांच्या जीवनविश्वातले अनंत अनुभव हेच कादंबरीचे आशयसूत्र आहे.

**वीरनायकाची स्वात्मसाधना**

बाह्य जगाला सामोरे जाताना, सामाजिक जीवनात मिसळताना, इतर

लोकांशी जुळते घेताना वीरनायकाने धारण केलेला मुखवटा म्हणजे पर्सोना. माणसाच्या व्यक्तित्वाचा अगदी वरचा स्तर. नदीष्टमधील वीरनायक हा निसर्गातील विविध अशा आविष्कारांमागचे कुतूहल जाणून घेऊ इच्छिणारा, उपेक्षित माणसांचे अनुभवविश्व जाणून घेऊ पाहणारा जिज्ञासू माणूस आहे, तसा कलंदर व मनस्वी असा छंदिष्ट (नदीष्ट) माणूसही आहे. नायकाच्या या अनुभवोत्सुक, धीट, जिज्ञासू आणि प्रांजळ मनाची ओळख कादंबरीतील अनेक घटना-प्रसंगांतून घडत जाते. समाजाच्या दृष्टीने तिरस्करणीय अशा माणसांचे विलक्षण असे जग जाणून घेत या नायकाच्या स्वात्मसाधनेला प्रारंभ होतो.

**सावलीचा आदिबंध - नेणिवेचा जाणीवपूर्वक शोध**

लेखकाच्या व्यक्तित्वाचा काही भाग जाणिवेशी निगडित अशा प्रकाशाचा, तर बराचसा भाग नेणिवेशी निगडित असलेल्या अंधाराचा (सावलीचा) असतो. आपल्यातला नकोसा असणाऱ्या व्यक्तित्वाचा हा भाग साहित्यिक साहित्यातील पात्रांवर आरोपित करतो. सर्जनशील लेखक विविध प्रकारच्या व्यक्तित्वांचे रेखाटन करत स्वत:ला अनेकांमध्ये विभागत असतो. काही वेळा खलनायक, विदूषक याबरोबरच मित्र, सोबती यांच्या प्रतिमेतही तो आविष्कृत होतो. तसा नदीष्ट मधील मंदिरातील पुजारी, झाडूवाला, नदीत गुरांना पाणी पाजायला आणणारा कालूभैया, दारू प्यायला व जुगार खेळायला येणारे तरुण, झाडाझुडपांच्या आडोशाला अंग धुवायला येणारी सकीना भिकारीण, विरक्तमनाचा भिकारी भिकाजी, तृतीयपंथी सगुणा, नदीभोवतालच्या झाडीत नाग सोडायला आलेला तरुण प्रसाद यांच्या रूपात तो प्रत्ययास येतो.

**'अनिमा'-स्त्रीची आदिप्रतिमा**

पुरुषाच्या सामूहिक अचेतनामध्ये ज्या स्त्रीसुलभ वृत्तिप्रवृत्ती असतात त्या स्त्रीच्या प्रतिमेत प्रकट होतात. ही स्त्रीप्रतिमा म्हणजे 'अनिमा.' हे स्त्रीत्वाचे सनातन अंग होय. या प्रतिमेच्या मुशीत नायक त्याच्या संपर्कात येणाऱ्या स्त्रियांचा अनुभव घेतो. नदीष्टमधील नायकाला रात्रीच्या वेळी कामाहून घरी परतताना ट्रेनमध्ये वा झिटमिटत्या पहाटे तो पोहायला आलेला असता भेटणारी, अंघोळीला आलेली कुरूप अशी 'सकीनाबी' भिकारीण वा पुढील प्रवासात समाजाच्या दृष्टीने तिरस्करणीय अशी

तृतीयपंथी सगुणा, त्यांचा समाज व नदीवर नवस फेडण्यासाठी येणारी स्त्री यातून प्रत्ययास येतात. नायकाच्या मनातला 'अनिमस' (पुरुष प्रतिमा) हा स्त्रीकडे स्वच्छ व निर्मळ नजरेने पाहातो. त्याच्या मनातले स्त्रीविषयक कुतूहल नैसर्गिक आहे. ते सकीनाबी बरोबर टिपते, "माटीमिले','पोट्टेपाट्टे पाहात राहातात. चंचीतला माखूल खुर्दा घेऊन उलाल होतात." (तत्रैव, पृ. १९) या वाक्यातून तिच्या मनातील स्त्रीसुलभ भावही स्पष्ट होतो. त्याचा निर्मळ व्यवहार पाहून तीच त्याला पहाटे पोहायला येण्याबद्दल 'मर जायेगा डूबके' म्हणून सावध करते. सतत दु:खभार सोसल्याने स्त्रियांच्या पिंडातच कुठेतरी आंतरिक शक्तीचा न आटणारा झरा लपलेला असतो, कठोर असे सावधपणही असते ते या व्यक्तिरेखांतून प्रत्ययास येते.

नदीच्या पोटात असणारा अंधार छेदत नित्यनियमाने पोहणे वा तिच्या गर्भाशयात शिरत तिच्याशी मैत्र जोडत जाणे यातून तो स्वत:चा शोध घेऊ लागतो. त्याची आयुष्याच्या सार्थकतेचा क्षण पकडण्याची अथक धडपड चालू होते. त्याच्या तासन्तास पाण्यात पोहण्याला जन्म-मृत्यूच्या प्रवासाचा संदर्भ आहे. अगणित अशी जीवसृष्टी पोटी वागवण्याचे सामर्थ्य असलेल्या पाण्यावरचा प्रवास म्हणजे चेतन मनाकडून निश्चेतनातील गुढतेकडे होणारा प्रवास आहे. नायकाचा नदीत पोहण्याचा छंद म्हणजे एक विसर्गही आहे. ही एक प्रकारची स्वात्मसाधनाही आहे. या स्वात्मसाधनेच्या एका टप्प्यावर 'अनिमा' या आदिबंधाचा आविष्कार प्रकट होताना दिसतो. नायकाच्या ठिकाणी असलेल्या अनिमाच्या मुशीत तो त्याच्या संपर्कात येणाऱ्या स्त्रियांचा अनुभव घेत असतो. यामध्ये बरेचदा सनातन स्त्रीप्रतिमेचे बरेवाईट रंग मिसळलेले असतात. नदीच्या तीरावर त्याला ज्या स्त्रिया भेटतात त्या 'अनिमा' या आदिबंधाचे प्रतीक आहेत. 'अनिमा' ही अंधाऱ्या आशयाने वेढलेली असते. पुरुषाच्या ठायी असलेल्या स्त्रीतत्त्वाला आपल्या पुरुषतत्त्वाशी संयुक्त करून घेतल्याखेरीज पुरुषाला पूर्णत्व प्राप्त होत नाही. येथे लेखकाला भेटलेली भिकारीण, नवऱ्याची दारू सुटावी म्हणून संध्याकाळच्या वेळी नदीवर अंघोळीचा नवस फेडण्यासाठी येणारी बाई आणि सगुणा ही हिजडा (अर्धनारीनटेश्वराचे प्रतीक) अशा अनिमांशी योग्य संबंध जोडले गेल्याने या अनिमाच त्याच्या स्वात्मसाधनेच्या प्रक्रियेतील मार्गदर्शिका ठरतात. तर्काच्या पलीकडील भाववृत्ती, व्यक्तीवर प्रेम करण्याची शक्ती, निसर्गाबद्दलची संवेदनशीलता व आकर्षण हे अनिमाशी निगडीत असते. अशा अनिमांशी या नायकाला योग्य प्रकारे संबंध जोडता

आल्याने त्याला अचेतन स्तरावरील विश्व खुले झाले. तसेच समीक्षक गंगाधर पाटील यांनी उद्धृत केल्याप्रमाणे 'मानवी मनातील स्त्रीशक्ती ही नेणीवशीलता, स्थाणुभाव, सर्जनशीलता व सर्वसमावेशक वृत्ती इत्यादी स्त्रीगुणांची जपणूक करत समाजमानसात निकोप समतोल राखण्याचा प्रयत्न करत असते.' (तत्रैव, पृ. १३) कलावंताचे सर्जनशील मन आपल्या सर्जनशील कृतींद्वारे हा समतोल राखण्याचा यत्न करत असतो. म्हणूनच त्याच्या साहित्यकृतीत वरील गुणांनी युक्त अशा स्त्रीप्रतिमा येतात.

नायकाला दिसणारा 'मोर'ही 'अनिमा'चा आविष्कारक आहे. त्याच्या ऐटदार चालीचे रहस्य उलगडण्यासाठी मोराचा पाठलाग करत जाणं, धुवाधार पावसांत शरीरातल्या साऱ्या रंध्रारंध्रातून पाऊस पिणं, पावसाचे नदीच्या पाण्यावर उठणारे तरंग पाहून 'स्वर्ग धरेला चुंबायाला आला' ही प्रचीती येणं, नदीचा परिसर न्हाऊन माखून सर्जनासाठी सज्ज झालेला पाहणं. व्हर्जिन नदीमध्ये पोहण्याची उत्कटता, पूर्ण कोसळणाऱ्या पावसाच्या धारांत व्यालेली म्हैस हे सर्जन, गर्द झाडी, पुरुषभर उंचीचे गवत, तहेदिल ओथंबलेला निसर्ग ही सारी अनिमाची धनात्मक रूपे येथे दिसतात.

नायकाच्या व्यक्तित्वात सामूहिक अचेतनाच्या स्तरावर नांदणाऱ्या या घटकांना नायक जाणिवेच्या पातळीवर आणत आपल्या भावभावनांवर ताबा मिळवत, स्वत:ला जगाशी जोडत स्वतंत्र व प्रगल्भ होत जातो. याचा प्रत्यय त्याने त्यांच्या जीवनातील अनुभवांचे सहानुभावाने केलेले कथन (संज्ञेचा आदिबंध) यातून प्रत्ययास येतो. उदाहरणार्थ, सगुणाचा आपण हिजडा आहोत या जाणिवेपासून, आपले घर सोडून त्यांच्या पंथात सामील होऊन त्यांच्या जगातील चित्तथरारक असा जीवनप्रवास, नवसासाठी नदीवर येणाऱ्या स्त्रीवर झालेला बलात्कार इत्यादी.

**आदिम पाणी : आदिमाता**

आदिमाता म्हणजे गोदामाताच नदीष्टमधील नायकाचे भरणपोषण करते, त्याच्या साऱ्या गरजा पूर्ण करते. ही माता त्याची तहानभूक भागवते. त्याला ऊब देते त्याचे रक्षण करते. मातेचा आदिबंध गोदामायच्या रूपाने आविष्कृत झाला आहे. ही माता एकीकडे करुणामयी आणि दुसरीकडे पोषक, विकासक आहे. तिचा परिसर हा त्याच्यासाठी जणू एक मोठा गर्भकोश होतो. महामातेच्या आदिबंधाचा म्हणजे एक प्रकारे सर्जनशक्तीचा आवश्यक पैलू म्हणजे ही महामाता स्वयंपूर्ण आहे. आईचे छत्र हरवलेल्या

या कादंबरीतील नायकाला गोदावरी नदी तिच्या कुशीत घेते. तिच्या अंगाखांद्यावर खेळणारा तिचा पुत्र तिच्या सान्निध्यात घेतलेल्या अनंत भल्याबुऱ्या अनुभवांनी समृद्ध होत जातो. तिच्या गर्भकोशात त्याला सुरक्षित वाटते. आदिमातेचा आदिबंध हा सर्वसमावेशक वृत्तीचा असल्याने तो सर्वांना आपल्यात सामावून घेत युगमनाशी संवाद साधत राहातो. आजची भौतिक संस्कृती ही मानवी मनाच्या मुळावरच घाव घालणारी अशा वेळी कलावंताना आपल्या स्वमूलकेंद्राची म्हणजेच जन्मदात्रीची-जन्मस्थानाची ओढ निर्माण होते.

आदिमानवाच्या लेखी पाणी हे शुभंकर आणि भयंकरही आहे. तेच जगवते आणि तेच पोटातही घेते. सर्जनाच्या शक्यता सामावणारा आदिम काळोख त्याच्या पोटात असतो. येथे गोदामाय ही 'सुमाता' या रूपात आपल्यासमोर येते. ती आणि तिचा परिसर हाच जणू त्याच्यासाठी एक गर्भकोश बनतो त्यामध्ये तो आपल्या सहजप्रवृत्तींच्या प्रभावाखाली जगत असतो. वीरनायकाच्या प्राक्कथेत नायक संज्ञाशील होताना त्याच्यावर संकटे कोसळतात. बरेचदा महामातेतील सुमाता आणि रुद्रमाता ही अंगे वेगळी होताना दिसतात. वीरनायकाचे अधिकाधिक संज्ञाशील होत जाणे म्हणजेच अचेतनाच्या मातृकोशापासून अधिकाधिक विलग होणे. महामातेमधील सुमातेला त्याने दूर जाणे त्याच्या वाढीसाठी पोषक वाटते. ही माता मुलाने दुरावू नये म्हणून महापूराचे रौद्ररूप धारण करते. येथे नदीत बुडून होणारे मृत्यूही नायकाला दिसतात. रुद्रमातेला मात्र त्याच्या वाढीत अडथळे येणे, त्याला दुरावणे आवडत नाही. ती त्याला गिळंकृत करू पाहाते. संक्रमणकाळातील हा नायक अचेतनाचे प्रदेश धुंडाळीत असताना (नदीतली व्हर्जिन जागा शोधताना) नदीतील आदिम अंधाराशी, अचेतनाच्या आंधळया शक्तींशी झगडा करताना त्याची दमछाक होते.

संज्ञाविकासाच्या या टप्प्यावर वावरणारा नायकातील 'अहं' हा सतत गोदामायच्या कुशीत शिरणारा, तिला शरण जाणारा, तिच्यात लुप्त होऊ पाहाणारा, तिच्या कुशीत आनंद मिळवणारा आहे. ही प्रवृत्ती अहंची वाढ झाल्यावरही टिकून राहाते. पौंगडावस्थेत नायकाला नदीतील व्हर्जिन जागा शोधावीशी वाटणं हेही सूचक आहे.जन्मरहस्याचा शोध घेण्याची त्याची ओढ त्यातून सूचित होते. त्याचबरोबर वीरनायकाला ही माता त्यावेळी स्वत:कडे आकर्षित करते. तेथील वाळू हातात घेऊन संकल्प केल्याने झालेल्या पुत्रप्राप्तीची कथा तो ऐकतो. नदीतील व्हर्जिन जागा

शोधताना तो थकतो, गुदमरतो पण मनाने घेतलेला ध्यास सोडत नाही. यातून त्याच्यातील लैंगिक ओढ सूचित होते. जाणीवेच्या पातळीवर तो हा संघर्ष करत असताना चेतनेच्या पातळीवर येऊ पाहाणारा अहं विकसित होताना त्याला मातेपासून अलग व्हावे लागते. मग बाहेरच्या जगाशी तो अधिक संबंध जोडू लागतो. उदाहरणार्थ, सगुणाच्या (हिजडा) मागोमाग जात तिचे आयुष्य जाणण्याचा यत्न, भिकाजीचे रहस्य जाणून घेण्याची बेचैनी, नाग पकडणाऱ्या माणसांचे अनुभव ही सामूहिक अचेतनाची प्रतीके वाटतात. भूमी, खोल विहीर यांसारखी गर्भाशयाचा आकार असलेली प्रतीके मातेच्या आदिबंधाची आविष्कारक असतात. नदीष्ट मध्ये असे आदिबंध ठायीठायी प्रकटलेले दिसतात. अचेतनातील अनिमा चेतना पातळीवर आणताना अचेतनाच्या काळोखाचे पाश अधिक दृढ होत जातात. सगुणा, सकीनाबी, नदीवर अत्याचाराला बळी पडलेली स्त्री यांचे जीवन समजून घेताना त्याच्या शक्ती अपुऱ्या पडू लागतात तेव्हा या वीरनायकामधील 'वृद्ध आप्त'चा आदिबंध कार्यशील होतो.

**'वृद्ध आप्त'चा आदिबंध**

नदीवर मासे पकडणारा पुरभाजी झिंगाभोई बामनवाड हा भोई, स्वत:च्या हातून नकळत घडलेल्या खुनाची शिक्षा भोगून मनाने विरक्त होऊ पाहाणारा भिकाजी, आपल्या पशुधनावर जीवापाड प्रेम करणारा कालूभैया आणि दादारावांसारख्या अनेक कलंदर अशा व्यक्तींच्या (वृद्ध आप्त) सान्निध्यात त्याला खऱ्या जीवनाची ओळख होते. हे 'वृद्ध आप्त' म्हणजे प्रत्येकाच्या ठायी असलेले मार्गदर्शक होय. ते गुरु, यती यांच्या रूपात प्रकटतात. वृद्ध आप्ताच्या रूपात भेटणारे दादाराव त्याला उत्तम पोहायला शिकवतात, बामनवाड भोई 'छनोछनी करावा हाच विचार! ऐसे घात करा सावधान!' (तत्रैव, पृ. २६) म्हणत पोहताना सावध राहायला सांगतो. नदीतील माशांच्या मोबदल्यात नदीत बुडणाऱ्या माणसांना वाचविण्याची जबाबदारी शिरावर घेतो. नदीतीरावर रानमांजर दिसताच पिसाळलेला भिकाजी आपल्या मांजरद्वेषाची कारणे आणि त्यापायी नकळत हातून घडलेला स्वत:च्या मुलीचा खून या घटनांतून मांजरापायी उद्ध्वस्त झालेल्या आपल्या आयुष्याची कहाणी नायकाला कथन करतो. इथे मांजर हे संज्ञाशील होण्यासाठी साधना करताना क्षुब्ध झालेल्या सहजप्रवृत्तींचे तसेच सभ्यतेचे आणि संस्कृतीचे सगळे पापुद्रे सोलून

आदिधर्माला जागणारे सामूहिक अचेतनाचे प्रतीक आहे. तसेच मांजर हे षष्ठी देवतेचे म्हणजे सटवाईचे वाहन किंवा तिचेच रूप मानले गेलेले आहे. आदिम मनाने ही सटवाई मुले खाणारी भयंकर देवता मानले आहे. त्याअंगाने भिकाजीच्या बहिणीच्या मृत्यूला कारणीभूत होणारी मांजर ही प्रतिमा येथे अर्थपूर्ण ठरते. वीरनायकाने अनुभवलेली अशी प्रतीकात्मक मरणे आणि पुनर्जन्म त्याच्या संज्ञाविकासाचे टप्पे म्हणून येतात. प्रत्येक पुनर्जन्माबरोबर त्याचे नवे रूप अधिक पौरुषयुक्त होते, त्याची इच्छाशक्ती बळकट होताना दिसते. 'चौकटीचं कधी दाराला ओझं होत नसतं.' (तत्रैव, पृ. ११७) म्हणत मागे आलेल्या मुलीला आधार देणारे भिकाजीच्या आईचे अनुभवाचे बोल. वा सर्व ऐहिक मोहाकडे पाठ फिरवून विरागी वृत्तीने जगू पाहाणाऱ्या भिकाजीचे बोल, 'दु:खाकडे पाहात राहाण्यापेक्षा दु:खाच्या कारणांचा शोध घे, जे बाळगावं लागतं त्याचंच ओझं खूप मोठं आहे. जे कमी करता येतं ते शक्य तेवढं कमी करावं.' (तत्रैव, पृ. ९२) 'माणसापासून तुटून राहिलं की नातेसंबंधांमुळे होणारा त्रास कमी होतो.' 'आपल्याला जी काही इजा होते ती मानवी स्पर्शानेच....निर्मनुष्य राहिलो तर आपला आतला-बाहेरचा कोलाहल आपोआप थंड होतो.' (तत्रैव, पृ. १६४) म्हणत मनात जागलेल्या सारासार विचारशक्तीने आंतरजीवन निर्मळ करण्याचा यत्न करतो. हे वृद्ध आप्ताच्या मार्गदर्शनासारखे आहेत.

ज्ञानवंत वृद्ध आप्ताची दुसरी प्रतिमा म्हणजे दादाराव. तान्हे असतानाच त्यांची माय दुरावते. भुकेने व्याकूळ झाले असता आपल्याला मृत आईच्या स्तनाला लुचवले गेले हे जाणतेपणी कळल्यावर आईचे वात्सल्य ते गोदामाईत शोधतात. 'मायची वल्ली माया नाय पण ही गोदामाय रोज वल्लं करून अंगभर माया करते.' (तत्रैव, पृ. १३८) म्हणत तिच्या अंगाखांद्यावर वाढतात. माणूसच या मायशी विपरीत वागू लागला तर ती रौद्ररूप धारण करते. 'नदीला आलेला महापूर म्हणजे तिची भडास आहे......या वरकरणी वाटणाऱ्या विनाशातही जीवन आहे.....महापूरात ती आपल्याकडून जे काही घेऊन जाते, त्याच्या दामदुपटीत जीवन पेरून जाते. तिला जीवन उद्ध्वस्त करायचे नसते, तर पुनरुज्जीवन करायचे असते, पण जेव्हा जेव्हा तिच्यावरील अत्याचाराचा अतिरेक होतो तेव्हा सारी कायनात तिच्या बाजूने उभी राहाते." (तत्रैव, पृ. ७९, ८०) असे म्हणत या निसर्गरूपाबद्दलची कृतज्ञता मनात पेरतात. आदिमानवाचे रूप भासणारा, जनावरांना जिवापाड जपणारा काळाकभिन्न कालूभैया, नदीच्या 'अनजान' जागेवरची वाळू

काढायला शिकवणारा, त्या वाळूमधील सर्जनाचे माहात्म्य सांगणारा, खोल पाण्यात मासे पकडायला जाणारा पुरभाजी झिंगाभोई बामनवाड, नदीवर नवस फेडण्यासाठी येणाऱ्या स्त्रीवर गुंडांनी केलेल्या अत्याचाराप्रसंगी तिला वाचवू शकत नाही म्हणून त्या आघाताने खंगत जातो, 'गोदामायला तोंड दाखविण्याच्या लायकीचे उरलो नाही.' म्हणत धाय मोकलून रडतो. मुलीच्या आत्महत्येने वेडापिसा झालेला इरबा देवळात मन:शांती मिळवू पाहातो, संघर्षास सिद्ध झालेल्या वीरनायकाचीच ही रूपे आहेत. याच वाटेवर त्याला महाविषारी नागाला पकडणारा तरुण प्रसाद "जंगल किंवा प्राणी विपरीत वागायला लागतात असे जेव्हा आपल्याला वाटते तेव्हा त्याचे वागणे विपरीत नसून माणसाला जसे वागायला हवे तसे ते तंतोतंत वागत असतात. आपल्या परिसरावरील सत्ता घोषित करण्यासाठी दोन नागांमध्ये होणाऱ्या झुंजीत ते कधी एकमेकांवर विखारी डंख करत नाहीत. माणूस मात्र आधी जहरी डंख करत सत्ता प्रस्थापित करतो.' (तत्रैव, पृ. १०३) असे अनुभवाचे बोल सुनावतो. याशिवाय वृद्ध आप्त आणि अनुभवी व्यक्तींच्या तोंडून प्राक्कथा सांगितल्या जातात. त्यांना नायकाच्या स्वात्मसाधनेच्या प्रवासात महत्त्व प्राप्त होते.

**नदीष्टमधील प्रतिमा, प्रतीके, प्राक्कथा**

आदिबंधात्मक कलाकृती ज्या आदिम प्रतिमांच्या संघटनेतून उभ्या राहातात त्या अनेकदा प्राक्कथांशी निगडित असतात. प्राक्कथांचा संबंध जीवनव्यवहारातील परिचित अशा वर्तनरूपांशी असल्याने त्या अखिल मानवजातीपर्यंत पोहोचू शकतात. लेखकाला प्राक्कथांची सनातन आवाहनक्षमता जाणवत असते म्हणूनच या युगाची अस्वस्थता समर्थपणे आविष्कृत करण्यासाठी तो जीवनावर भाष्य करणाऱ्या प्राक्कथांचा आश्रय पुन:पुन्हा घेताना दिसतो. नदीष्टमधील अनेक प्राक्कथांतून जीवनाचे सनातन आकृतिबंध नव्याने उजळून निघतात. आदिमकाळापासून मानवाला अतिमानवी शक्तींबद्दल आकर्षण आहे. पांढरपेशी जीवनाच्या मर्यादा मोडता न येणाऱ्या मानवाला त्या मर्यादा उल्लंघून पलीकडे जाऊ शकणाऱ्या माणसांबद्दल जसे आकर्षण वाटते तसेच आकर्षण कादंबरीतील या नायकालाही वाटते. डार्विनचा उत्क्रांतिवाद त्याला नदीकाठच्या चिंचेच्या झाडावरील माकडांच्या वर्तनातून प्रत्ययास येतो तशी माकडांनी हरणावर केलेल्या हल्ल्यातून परोपकाराच्या भावनेबरोबरच येणाऱ्या प्राण्यांतील आदिम हिंस्रतेच्या रूपाची 'याची देही याची डोळा' प्रचिती येते.

लेखकाची स्वात्मसाधनेची प्रक्रिया ही अनेकदा प्रवासाच्या प्रतिमा, प्रतीकांतून आविष्कृत होताना दिसते. त्याचे सातत्याने नदीत पोहणे म्हणजे ज्ञाताकडून अज्ञाताचा शोध घेणे होय. ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. बाहेरचे अनोखे विश्व अनुभवताना तो स्वत:च कसा समृद्ध होत जातो, ते कादंबरीच्या अखेरच्या टप्प्यावर लक्षात येते. लेखक, नायकाने कथन केलेल्या प्राक्कथेच्या मुशीतून आपल्या आयुष्याचे आकलन मांडतो. माणूस आणि प्राणी यांना कराव्या लागणाऱ्या श्रमाच्या भेदाच्या संदर्भातील 'शंकर व नंदीची गोष्ट', सगुणाच्या आज्याने कीर्तनात सांगितलेली रामायणातील गोष्ट. त्यातील हिजड्यांना रामाने 'कोणत्याही शुभकार्यात तुमचे आशीर्वाद मोलाचे समजले जातील' असा दिलेला वर. दरवर्षी चैत्रपौर्णिमेला कुवागम येथे भरणाऱ्या जत्रेत हिजड्यांना मिळणारे 'औटघटकेचे सौभाग्य' त्यांच्यालेखी किती महत्त्वाचे असते, हे सांगण्यासाठी सगुणाने सांगितलेली महाभारतातील अर्जुनपुत्र ईरवानच्या शौर्याची कथा, सहवासात आलेल्या माणसांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या कहाण्या, करीम टोपीवाल्याची गोष्ट इत्यादी.

नायकाला तृतीयपंथी सगुणा ही 'वाळूचा अखंड उपसा करत तिला 'झकझोर' करून टाकणाऱ्या व्यवस्थेचा बळी वाटते. जेव्हा ती रेल्वेच्या डब्यात त्याच्या प्रथम दृष्टीस पडते तेव्हा तिचे रूप पाहून तो नजर दुसरीकडे वळवतो, तेव्हा ते पाहून तिने केलेला प्रश्न 'आँखमे आँख डालके देखनेवाला हिजडा की नजर चुरानेवाला हिजडा? आँख चुरानेवाला हिजडा हुआ ना रे?" (तत्रैव, पृ. ६१) या तिच्या प्रश्नाने वरकरणी समाजाच्या दृष्टीने बीभत्स असलेल्या हिजड्यात असलेले एक अविश्वसनीय शहाणपण त्याला कळून चुकते. तेव्हापासून तिला जाणून घेण्याचा ध्यास त्याच्या मनात निर्माण होतो. अखेरच्या क्षणी आईच्या भेटीसाठी व्याकूळ झालेल्या तिची, जेव्हा आईशी भेट घडवून द्यायला स्वत:तील पांढरपेशेपणा आड येतो. तेव्हा 'आपणच आपल्या बिरादरीची इज्जत वाढवण्यात कमी पडलो पण एक हिजडा मात्र आपली मर्दानगी शाबित करून गेला. 'तृतीयपंथीय ही गोष्ट शारीर पातळीवर असते.' एवढाच आवाका असलेल्या मला ती मानसिक पातळीवरील हिजडेपणापर्यंत घेऊन गेली.' (तत्रैव, पृ. १६४) या शब्दांत त्याने आपल्या मनाचा कोतेपणा निर्भीडपणे कबूल केला आहे. 'आपल्याभोवती सतत वावरणारी माणसं म्हणजे 'foreign language'. इवल्याशा माणसांचे अंतरंग हाती लागत नाही तर अथांग तळ असलेल्या नदीचे कसे लागणार?......नदीच्या परिसरात भेटलेल्या सजीव-निर्जीव

प्रत्येकाने आपल्याला वेगळ्या अर्थाने समृद्धच केले.” म्हणत तो त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो. (तत्रैव)

‘आपण ‘नादिष्ट’ नाही, नदीष्ट आहोत.’ या माणसांच्या विश्वात नदीच्या आतला सभोवतालचा किंचितसा कोलाहल ऐकू आला या ऐकण्याचा व्हॉल्यूम थोडा वाढवला तर..? पण त्यासाठी आपल्या साऱ्यांनाच आपले कान अधिक तीक्ष्ण करावे लागतील तरच ती प्रवाही राहील आणि आपले जगणे प्रवाही राहील.’ (तत्रैव) असे त्याला वाटते. नदीष्ट हा शब्द लेखकाने घडविला आहे. तो जसा त्याच्या पोहण्याच्या छंदिष्टपणाची व्याप्ती अधोरेखित करतो तसा त्याचे आदिमतेशी असणारे नाते स्पष्ट करतो. असेच इतरही अनेक शब्द व वाक्प्रयोग लेखकाने जाणीवपूर्वक घडवले वा योजले आहेत. उदाहरणार्थ, ‘व्हर्जिन प्लेस’, ‘ढकलस्टार्ट गाडी’, ‘पुरभाजी झिंगाभोई बामनवाड’, ‘मालाडी’, ‘वास्तवाची हमजमीन’, ‘कायनात’, ‘जान’, ‘डॉज देणे’, ताउम्र बरकरार’, ‘भावनिक आत्मगत’, ‘झकझोर’ ‘औटघटकेचे सौभाग्य’, ‘ट्रॅजिक ड्राम्यानंतरचा कॅथार्सिस’, ‘अनगिनत सौगात’ ‘देग्गर आच्चा दूरम पोईदी’ इत्यादी. यांना आशयाच्या संदर्भात सखोल असा अर्थ प्राप्त होतो. तसेच तृतीयपंथियांचे प्रकार त्यांच्या जीवनव्यवहारातील शब्द वाचकाला वेगळ्या विश्वाची ओळख करून देतात.

कादंबरीच्या अखेरीस येणारे नायकाचे चिंतनपर भाष्य चराचर सृष्टीचे त्याला झालेले आकलन मांडणारे आहे. उदाहरणार्थ, ‘आपल्या ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व आर्थिक जगण्याचा अविभाज्य भाग असलेली, युगानुयुगाच्या आपल्या अस्तित्वातून वाहणारी नदीच काढून टाकली तर जगणेही संपुष्टात येईल. काही कोस अंतर पार केल्यावर नदीचे पाणी आपोआप शुद्ध होते तसे काही अंतर चालून गेल्यावर आपल्यालाही शुद्ध होता आले तर?” हे कादंबरी नायकाने उद्धृत केलेले अनेक प्रश्न मानवजातीची उत्सुक आणि अपरिहार्य तळमळच व्यक्त करतात.

**संदर्भ :**

१. बोरगावकर, मनोज (२०१९) : नदीष्ट, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

२. ढेरे, अरुणा (१९८७) : काळोखाचे कवडसे, सुरेश एजन्सी, पुणे.

३. पाटील, म. सु. (१९८९) : आदिबंधात्मक समीक्षा, निहारा प्रकाशन, पुणे.

४. पाटील गंगाधर (संपा.) (१९६६) : सुहृदगाथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

संभाषित

# दलित पँथरच्या इतिहासात भर घालणारे पुस्तक : *दलित पँथर अधोरेखित सत्य*

अविनाश कोल्हे

सेवानिवृत्त प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग
डी. जी. रुपारेल महाविद्यालय, मुंबई.
nashkohl@gmail.com

संक्षिप्त

मागच्या वर्षी म्हणजे २०२२ साली 'दलित पँथर'च्या स्थापनेला पन्नास वर्ष पूर्ण झाली. दलित पँथरच्या स्थापनादिनाबद्दल संस्थापकांत वाद असले तरी या संघटनेच्या जन्मवर्षाबद्दल वाद नाही. असे वाद असले तरी  दलित पँथरचे महत्त्व यत्किंचितही कमी होत नाही. २०२२ साली साजऱ्या झालेल्या दलित पँथरच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त अनेक वृत्तपत्रांनी खास पुरवण्या, अनेक मासिकांनी खास अंक प्रकाशित केले. तसेच काही पुस्तकं या निमित्ताने वाचकांसमोर आली. यातील महत्त्वाचे पुस्तक म्हणजे ऑक्टोबर २०२१ मध्ये प्रसिद्ध झालेले सुप्रसिद्ध कवी, अभ्यासक अर्जुन डांगळे (जन्म: १९४५) यांचे *दलित पँथर अधोरेखित सत्य* हे होय. १९७२ साली दलित पँथर स्थापन झाली तेव्हा डांगळे सत्तावीस वर्षांचे होते. डांगळे दलित पँथरच्या संस्थापक-सदस्यांपैकी एक महत्त्वाचे नाव. म्हणून त्यांनी २०२१ साली केलेल्या मांडणीचे महत्त्व आहे. दलित पँथरच्या जन्माबद्दल, या संघटनेच्या विकासाबद्दल आणि नंतर यात पडलेल्या फुटीबद्दल याआधी ज. वि. पवार, राजा ढाले, नामदेव ढसाळ वगैरे नामवंतांनी ग्रंथलेखन करून आपापली बाजू मांडलेली आहे. या पार्श्वभूमीवर डांगळेंचा ग्रंथ आता वाचकांना तसेच अभ्यासकांना उपलब्ध झाला आहे.

स्वतंत्र भारतातील आंबेडकरी चळवळीत ऑक्टोबर १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेबांनी केलेले सामूहिक धर्मांतर आणि १९७२ साली स्थापन झालेली दलित पँथर, या दोन अतिशय महत्त्वाच्या घटना आहेत. या वाक्यातील '१९७२ साली' हे शब्दप्रयोग महत्त्वाचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाल्यानंतर त्यांच्या अनुयायांनी ऑक्टोबर १९५७ रोजी बाबासाहेबांच्या स्वप्नातील 'रिपब्लिकन पार्टी' स्थापन केली. त्याआधी बाबासाहेबांनी १९४२ साली स्थापन केलेला 'शेडयुल्ड कास्ट फेडरेशन ऑफ इंडिया' हा त्यांचा पक्ष १० सप्टेंबर १९५६ रोजी विसर्जित केला आणि रिपब्लिकन पक्षाची घोषणा केली. दुर्दैवाने त्यांना सहा डिसेंबर १९५६ रोजी मृत्यूने गाठले. संसदीय राजकारण करण्यासाठी प्रशिक्षित राजकारण्यांची गरज असते याचा बाबासाहेबांचा अचूक अंदाज होता. म्हणूनच बाबासाहेबांनी १९५६ साली 'द ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स' अशी प्रशिक्षण संस्था स्थापन केली होती. या संस्थेतून बारा विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर ही संस्था बंद पडली. असे जरी असले तरी आज अभ्यासकांना ते बारा विद्यार्थी कोण होते, त्यांची नावं काय? त्यांचे पुढे काय झाले, वगैरेत रुची आहे. ही माहिती उपलब्ध असली तर समाजासमोर

आली पाहिजे. (१९८२ साली संघ परिवाराने भाईंदर येथे 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी' देखील याच हेतूने स्थापन केली होती.) १९५७ साली स्थापन झालेल्या रिपब्लिकन पार्टीत यथावकाश फूट पडली. यामागे नेत्यांचा स्वार्थ जसा होता तसेच राजकीय तत्त्वज्ञानाचासुद्धा मुद्दा होता. आंबेडकरवाद प्रमाण मानायचा की मार्क्सवाद प्रमाण मानायचा, यावरून रिपब्लिकन पक्ष फुटला आणि नंतर फुटतच गेला. आज रिपब्लिकन पक्षाचे सुमारे दोन डझन गट आहेत.

९ जुलै १९७२ साली स्थापन झालेली आणि ७ मार्च १९७७ रोजी विसर्जित करण्यात आलेली दलित पँथर समजून घेण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचा इतिहास माहीत असणे गरजेचे आहे. रिपब्लिकन पक्ष स्थापन करणाऱ्या नेत्यांतील व्यक्तिगत असूया, स्वार्थ याविरुद्ध केलेले बंड हा दलित पँथरच्या उदय आणि विकासाचे (आणि ऱ्हासाचेसुद्धा) एक महत्त्वाचे कारण होते. दलित पँथर फुटली तीसुद्धा नेत्यांतील व्यक्तिगत असूया, परस्परांबद्दल असलेला अविश्वास आणि आंबेडकरवाद की मार्क्सवाद, याबद्दल झालेल्या वादावादीवरून. हा सर्व इतिहास एव्हाना समाजाच्या परिचयाचा झालेला आहे. या पार्श्वभूमीवर डांगळेंच्या पुस्तकाचा विचार करावा लागतो. डांगळेंच्या पुस्तकात वीस




प्रकरणं, तब्बल वीस परिशिष्टं आणि ६२ कृष्णधवल छायाचित्रं आहेत. छायाचित्रांत शहीद भागवत जाधव, दलित पँथरच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष रामदास सोरटे, लतिफ खाटिक, उमाकांत रणधीर, भगवान झरेकर वगैरे

संभाषित

महत्त्वाच्या कार्यकर्त्यांची छायाचित्रं आहेत. दलित पँथरचा इतिहास घडवणारे यातील अनेक कार्यकर्ते एव्हाना काळाच्या पडद्याआड गेले असतील. त्यांची छायाचित्रे आणि वीस परिशिष्टांमुळे डांगळेंच्या पुस्तकाचे संदर्भमूल्य वाढले आहे.

डांगळेंच्या पुस्तकाला सामोरे जाताना त्यांनी या पुस्तकाला लिहिलेलं 'मनोगत' व्यवस्थित समजून घेतलं पाहिजे. यातून त्यांची २०२१ साली हे पुस्तक लिहिण्यामागची भूमिका स्पष्ट होते. 'मनोगत' मध्ये डांगळे म्हणतात 'अशा दलित पँथर हया चळवळीतील घटना, प्रसंग, संदर्भ मांडतांना त्यातील सत्याशी आणि तथ्यांशी छेडछाड होणार नाही हयाची काळजी घ्यावी लागते. नव्हे, ती घेणे आवश्यकच आहे. हितसंबंधी प्रवृत्तीतून अशा प्रकारचा धोका अधिक संभवतो आणि मला अशा प्रकारची छेडछाड, सत्याचा अपलाप, अर्धसत्य, एकारलेपण असे काही दोष 'दलित पँथर'चा कालपट मांडणाऱ्या लिखाणात दिसून आले... हा सर्वंकष विचार करून आणि हया चळवळीशी संबंधित असलेला लेखक-कार्यकर्ता म्हणून चळवळीचा वस्तुनिष्ठ आलेख नव्या पिढीसमोर मांडावा हादेखील उद्देश या लेखनाच्या मागे आहे.' याचा अर्थ असा की डांगळेंना आतापर्यंत दलित पँथरवर लिहिलेल्या पुस्तकांत काही त्रुटी, काही चुकीची माहिती आढळली. डांगळे 'मनोगत'मध्ये जी स्वागतार्ह भूमिका घेतात त्याची दखल घेतली पाहिजे. डांगळे लिहितात 'माझ्या पुस्तकात कुणाला हया चळवळीच्या संदर्भात काही मौलिक तथ्यांशी किंवा सत्याशी छेडछाड वाटली आणि ती माझ्या निदर्शनास त्यांनी आणून दिली, तर सत्यता पटल्यास त्यामध्ये योग्य ती सुधारणा करण्याची माझी तयारी आहे. कारण चळवळ ही कुणा एकटयाची मक्तेदारी नसते. तिच्यावर संबंधित जनतेचा हक्क असतो (मनोगत ८).'

वर उल्लेख केल्याप्रमाणे 'दलित पँथर'बद्दल तिच्या संस्थापकांत जे अनेक वाद आहेत त्यातील एक वाद म्हणजे पँथरच्या जन्मदिवसाबद्दलचा वाद. ज. वि. पवारांच्या मते पँथरचा जन्म १९ मे १९७२ मुंबईच्या रस्त्यावर झाला ('आकलन'जुलै-सप्टेंबर २०२२, पृ.१५). तर डांगळेंच्या मते '५ जुलै १९७२ म्हणजे कामाठीपुऱ्यातील बाप्टी रोड इथल्या म्युनिसिपल वसाहतीत कामगार केंद्राच्या हॉलमध्ये भरलेल्या मेळाव्यात 'दलित पँथर'च्या स्थापनेवर शिक्कामोर्तब झाल्याचा दिवस' (पृ. ८२). डांगळेंच्या पुस्तकात हा उल्लेख आठव्या प्रकरणात ८२ व्या पानावर येतो. याचे कारण आधी त्यांनी यापूर्वीच्या पानांत 'दलित पँथर'च्या उदयामागची पार्श्वभूमी व्यवस्थित मांडली आहे.

संमाशित

'दलित पँथर'सारखी वादळी घटना निर्वात प्रदेशात घडत नाही. अशा घटना राजकीय-सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक प्रक्रियेचा भाग असतात, याचे डांगळेंना योग्य भान आहे. म्हणूनच त्यांनी आधीच्या प्रकरणांत दलित साहित्य चळवळीचा आढावा घेतला तसेच दलित पँथरच्या स्थापनेच्या आधी काय स्थिती होती, यावर प्रकाश टाकला आहे.

३ ऑक्टोबर १९५७ रोजी 'रिपब्लिकन पक्षाची' स्थापना झाली. पण लवकरच म्हणजे १४ मे १९५९ रोजी बी. सी. कांबळे रिपब्लिकन पक्षातून बाहेर पडले आणि 'दुरुस्त गट' स्थापन केला. त्याचप्रमाणे 'संयुक्त महाराष्ट्र समिती'तून बी. सी. कांबळे बाहेर पडले. नंतर १९६० साली स्थापन झालेला संयुक्त महाराष्ट्र, १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकांत 'समिती'ला आलेले अपयश, ऑक्टोबर १९६२ मध्ये आर. डी. भंडारेंनी स्वतःचा गट स्थापणे, नंतर १९६४ साली दादासाहेब गायकवाडांनी काढलेला भूमिहीन मजुरांचा विराट मोर्चा, १९६७ सालच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी झालेला काँग्रेस-रिपब्लिकन समझोता वगैरे घटना व्यवस्थित दिल्यामुळे १९७२ सालचा दलित पँथरचा जन्म कसा अपरिहार्य होता, हे अधोरेखित होते. डांगळेंसारखी या सर्वांचा साक्षीदार आणि सहभागी व्यक्तीच अशाप्रकारे महत्त्वाचे सर्व संदर्भ देत असा मोठा पट उभा करू शकते. याला संशोधनशास्त्रातल्या इंग्रजी परिभाषेत Participant Observer म्हणतात.

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित समाजावरील अत्याचारांत वाढ झाली. परभणीच्या ब्राह्मणगावात एका दलित महिलेची नग्नावस्थेत धिंड काढली होती, पुण्यातील 'इंदापूर बावडया'त दलित समाजावर सामूहिक बहिष्कार घालण्यात आला होता तसेच अकोल्यातील 'धाकली'त गवई बंधूचे डोळे काढण्यात आले होते. महाराष्ट्रातील या घटनांच्या जोडीने एका राष्ट्रीय घटनेचा उल्लेख करणे गरजेचे आहे. 'पेरूमल समिती'चा अहवाल १० जानेवारी १९७० रोजी संसदेला सादर करण्यात आला. दलित समाजावर होत असलेल्या अत्याचारांची चौकशी करण्यासाठी पेरूमल समिती गठीत केली होती. या अहवालाने सर्व संबंधितांची झोप उडवली. या अहवालातून समोर आलेली वस्तुस्थिती एवढी भयानक होती की इंदिरा सरकारने तर हा अहवाल संसदेत सादर केलाच नाही. या व्यापक पार्श्वभूमीवर दलित पँथरच्या जन्माकडे बघावे लागते.

दलित समाजाच्या संदर्भात दादरच्या आंबेडकर महाविद्यालयातील 'सिद्धार्थ वसतिगृहा' चे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या वसतिगृहातून दलित

तरुणांनी अनेक लढे लढवले. डांगळे दाखवून देतात की दलित पँथरच्या आधी या वसतिगृहातील तरुणांची 'युवक आघाडी' ही संघटना होती (पृ.७०). अभ्यासू वृत्तीचे डांगळे नमूद करतात की तरुणांचे अनेक लढे वसतिगृहातून सुरू झालेले दिसून येतात. त्यांनी नोंद घेतली नाही पण प्रजासत्ताक भारतातील विद्यार्थ्यांचा महत्त्वाचा लढा म्हणजे १९७० च्या दशकात आसाममधला बेकायदेशीर बांगलादेशींच्या विरोधातला लढा. या लढयातून नंतर आसामचे मुख्यमंत्री झालेले विद्यार्थीनेते प्रफुल्लकुमार महांतो हे अलीकडचे उदाहरण आहे. बावडा येथे दलित समाजावर टाकण्यात आलेल्या बहिष्काराच्या विरोधात युवकांच्या बरोबरीने 'युवक आघाडी' सामील होती. या मंडळींनी मे १९७२ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' या बंगल्यावर धरणे धरले होते. या घटनेबद्दल ज. वि. पवार (*आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ* खंड ४), नामदेव ढसाळ (*दलित पँथर: एक संघर्ष*), आणि राजा ढाले (*दलित पँथरची संस्थापना: वस्तुस्थिती आणि विपर्यास*) यांनी आपापल्या पुस्तकात वेगवेगळी माहिती दिली आहे. 'यांनी माझा युवक आघाडीतील सहभाग नाकारला आहे,' असा डांगळेंचा आरोप आहे. वास्तविक पाहता डांगळे 'युवक आघाडी'चे अध्यक्ष होते! डांगळेंच्या या पुस्तकात असे अनेक प्रसंग आहेत ज्यातून वाचकांना दिसते की पँथरच्या अनेक संस्थापक- नेत्यांनी, 'दलित पँथर' चे नाव घेत मोठे झालेल्या लेखक-कवींनी, स्वतःच्या सोयीचा इतिहास लिहिला आहे. अशा स्थितीत नेमके काय घडले, केव्हा घडले याचा निर्णय करणे अवघड आहे. मात्र बावडाप्रकरणी डांगळेंच्या पुस्तकात एक महत्त्वाचा उल्लेख आहे. 'भगवान झरेकर सचिवालयात नोकरीला होता. बावडाप्रकरणी सक्रिय भाग घेतल्याबद्दल त्याला चौकशी लागली. नंतर तो नोकरीचा राजीनामा देऊन देहूरोडला स्थायिक झाला'(पृ.८३). हा उल्लेख वाचून मनात प्रश्न उपस्थित झाला की सामाजिक न्यायाच्या लढयात सहभागी झालेल्या आपल्यातील एका दलित तरुणाला सरकारी नोकरीचा राजीनामा द्यावा लागला; अशा स्थितीत इतरांनी याच्या विरोधात आवाज का उठवला नाही? मुख्यमंत्र्यांना निवेदन का दिले नाही? एका कार्यकर्त्याची होरपळ होत असताना इतर दलित युवक शांत का बसले?

'दलित पँथर'ची स्थापना झाल्यानंतर दखल घ्यावी अशा काही मोजक्या घटनांची येथे चर्चा करणे गरजेचे आहे. यातील एक घटना म्हणजे 'साधना साप्ताहिका'चा १९७२ सालचा 'काळा स्वातंत्र्यदिन विशेषांक.' स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात 'साधना'ने 'काळा स्वातंत्र्यदिन' विशेषांक काढण्याचे

ठरवले होते. या अंकासाठी मजकूर मिळवण्याकरता साधनाचे कार्यकारी संपादक डॉ. अनिल अवचट मुंबईत येऊन निरनिराळ्या कार्यकर्त्यांना भेटत असत. या अंकात राजा ढालेंच्या गाजलेल्या आणि वादग्रस्त ठरलेल्या लेखासोबतच डांगळे, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर वगैरेंचेसुद्धा लेख होते (पृ. ८७). डांगळे नमूद करतात त्याप्रमाणे यातील दया पवारांच्या 'विटाळ' या लेखाची आंबेडकरी जनतेत चर्चा झाली. प्रिया आडारकरने या लेखाचा इंग्रजी अनुवाद 'मिरर'मध्ये प्रसिद्ध केला होता. डांगळे पुढे असेही नमूद करतात की या लेखात दयाच्या आत्मचरित्राचा *बलुतं*चा उगम दिसून येतो. 'साधना'च्या अंकाकडे तसे दुर्लक्ष झाले असते पण 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये २४ ऑगस्ट १९७२ रोजी दुर्गा भागवतांच्या प्रसिद्ध झालेल्या पत्राने वादळ निर्माण केले. अशा  बारीकसारीक आणि महत्त्वाच्या तपशिलांमुळे पुस्तकाचे महत्त्व वाढले आहे. यथावकाश 'दलित पँथर' मध्ये नामदेव ढसाळ आणि राजा ढाले अशी दोन केंद्रं निर्माण झाली. प्रकरण अकरामध्ये लेखकाने पँथरच्या चढत्या आलेखाचे तपशील दिले आहेत. २० मे १९७३ रोजी पँथरची नवी कार्यकारिणी जाहीर झाली. त्यानुसार पँथरचा अध्यक्ष राजा ढाले तर उपाध्यक्ष विठ्ठल साठे होते. पुढे यातूनच 'दलित पँथर'चे 'पंचक' तयार झाले ज्यात राजा ढाले, नामदेव ढसाळ, भाई संगारे, अविनाश महातेकर आणि ज. वि. पवार होते (पृ. १०२). पँथरच्या उतरत्या काळात याच पंचकाचा उल्लेख 'पाच पीर' असा कुत्सितपणे होत होता. डांगळे विवेचनाच्या या टप्प्यावर एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतात की ९ जुलै १९७२ रोजी जन्मास आलेल्या आणि ७ मार्च १९७७ रोजी विसर्जित झालेल्या पँथरच्या या छोटयाशा काळात ती जनमानसात कशी रुजली? आजही इतक्या वर्षानंतरही लोक पँथरची आठवण का काढतात? याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पँथरने दिशाहीन झालेल्या आंबेडकरी जनतेत जान फुंकली होती. गटा-तटात विभागलेल्या आणि फक्त स्वार्थी राजकारण करणाऱ्या दलित पुढाऱ्यांवर वचक बसवला होता. गोरगरीब दलित जनतेवर होत असलेल्या अत्याचारांना सक्रिय वाचा फोडली होती. या परिक्षणकर्त्याच्या मते 'दलित पँथर एक स्वप्न होते.'

डांगळेंनी तेराव्या प्रकरणात जानेवारी १९७४ मध्ये झालेली वरळीची दंगल आणि लोकसभेची पोटनिवडणूक या महत्त्वाच्या घटनांची विस्तृत चर्चा केली आहे. सरकारने आर. डी. भंडारे यांची 'राज्यपाल'पदावर नेमणूक केल्यामुळे वरळी लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली. यानिमित्ताने मात्र भलाबुरा इतिहास रचला गेला. १३ जानेवारी १९७४ रोजी

निवडणूक जाहीर झाली. डांगळे नमूद करतात त्याप्रमाणे रामराव आदिक (काँग्रेस ), रोझा देशपांडे (भारतीय कम्युनिस्ट पार्टी), डॉ. वसंतकुमार पंडित (भारतीय जनसंघ) आणि विक्रम सावरकर (हिंदुमहासभा) हे चार उमेदवार जरी रिंगणात असले तरी खरी लढत होती रामराव आदिक आणि रोझा देशपांडे यांच्यात (पृ.१३६). या मतदारसंघात दलित-कष्टकरी समाज मोठया प्रमाणात होता. मतदारसंघाचा हा चेहरा लक्षात घेतला पाहिजे. याचा खरा अर्थ असा की दलितांची मतं निर्णायक ठरणार होती. नेमक्या याच कारणांमुळे पुढचे रामायण घडले आणि दंगल झाली. आदिकांना रिपब्लिकन पक्षाचा आणि शिवसेनेचा पाठिंबा होता. काँग्रेसने ही निवडणूक प्रतिष्ठेची केलेली होती या अगोदर झालेल्या तीन पोटनिवडणुकांत सातत्याने काँग्रेसचा पराभव झाला होता. या पोटनिवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेसमधील अंतर्गत राजकारणाला ऊत आला होता. आदिकांना पाडण्यासाठी काँग्रेसमधील एक गट कार्यरत होता.

वरळीची पोटनिवडणूक जाहीर होण्याच्या आधी म्हणजे डिसेंबर १९७३ मध्ये मुंबईतल्या गिरणी कामगारांचा ‘बेमुदत संप’ सुरू झाला होता. बहुसंख्य गिरणी कामगार या मतदारसंघात राहत होते. दलित पँथरने गिरणी कामगारांच्या संपाला पाठिंबा दिला होता. एवढेच नव्हे तर २ जानेवारी १९७४ रोजी जो ‘महाराष्ट्र बंद’ झाला होता त्यालासुद्धा दलित पँथरने पाठिंबा दिला होता. या नोंदीनंतर डांगळे जी माहिती देतात ती फार महत्त्वाची आहे. या माहितीचा आजच्या राजकारणाशी संबंध दाखवता येतो. हिंदुत्ववादी भारतीय जनसंघाचे उमेदवार डॉ. पंडित यांना समाजवादी जॉर्ज फर्नांडीस आणि मधू लिमयेंनी पाठिंबा दिला होता ( पृ. १३७)! ( पुढे जॉर्ज फर्नांडिसांनी तीन महिन्यांनंतर म्हणजे मे १९७४ मध्ये रेल्वे कर्मचाऱ्यांचा देशव्यापी संप घडवून आणला होता तर मधू लिमयेंनी जनता पक्षाच्या सरकारात भारतीय जनसंघाच्या वाजपेयी / आडवाणी या मंत्र्यांच्या दुहेरी निष्ठेचा मुद्दा उपस्थित केला. यातून झालेल्या वादावादीनंतर जनता पक्षाचे सरकार कोसळले होते). वरळी मतदारसंघातील दलित समाजाच्या मतांना अतोनात महत्त्व प्राप्त झाले. वर उल्लेख केल्याप्रमाणे काँग्रेसने ही पोटनिवडणूक प्रतिष्ठेची केली होती. अर्जुन डांगळेंनी यातील नाटय नेमक्या शब्दांत पकडले आहे.

काँग्रेसने दलित मतदारांची मतं खिशात घालण्याच्या हेतूने दलित पँथरच्या नेत्यांशी चर्चा सुरू केली (डांगळेंच्या शब्दांत ‘डील’). या निवडणूकीच्या संदर्भात दलित पँथरची भूमिका जाहीर करण्यासाठी ५ जानेवारी १९७४ ला संध्याकाळी साडेसात वाजता वरळीच्या आंबेडकर मैदानात सभा आयोजित

समीक्षा

करण्यात आली होती. येथे डांगळेंसारखी जेष्ठ व्यक्ती महत्त्वाचे तपशील देते. 'वरळी भागात पँथरला तसा फार मोठा पाठिंबा नव्हता. वरळी बीडीडी चाळ परिसर तसा दलित पँथरचा बालेकिल्ला नव्हता' (पृ. १३८). आर. डी. भंडारेंनी केव्हाच काँग्रेसमध्ये प्रवेश केलेला होता. (येथे डांगळेंनी श्रीयुत आर. डी. भंडारेंबद्दल थोडी माहिती द्यायला हवी होती. भंडारे 'रिपब्लिकन पक्षा'चे संस्थापक-सदस्य होते. ते १९६० च्या दरम्यान महाराष्ट्र विधानसभेत विरोधी पक्षनेते होते. १९६४ ते ६६ दरम्यान ते रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष होते. नंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. १९६७ आणि १९७१ साली त्यांनी काँग्रेसच्या तिकिटावर मध्यमुंबई मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली आणि दोन्ही खेपेला जिंकली होती. १९७३ साली त्यांना केंद्र सरकारने बिहारचे 'राज्यपाल' नेमले होते. परिणामी त्यांना राजीनामा द्यावा लागला होता आणि म्हणून जानेवारी १९७४ मध्ये मध्यमुंबई मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली).

डांगळे नमूद करतात त्याप्रमाणे निवडणूकीवर बहिष्कार टाकावा हे जाहीर करण्यासाठी ज. वि. पवारांनी सगळी तयारी केली होती. सभेत राजा ढाले, नामदेव ढसाळ, भाई संगारे, ज. वि. पवार, अनिल बर्वे वगैरे बोलणार होते. सभेला तुफान गर्दी झाली होती. 'दलित पँथर' काय भूमिका जाहीर करणार हे प्रत्यक्ष ऐकण्यासाठी तेव्हा मंत्री असलेले ए. आर. अंतुले उपस्थित होते. राजा ढालेंचे भाषण सुरू असताना प्रचंड दगडफेक सुरू झाली. पोलिसांनी सभा उधळून लावली. यासाठी सरकारी गुंडांनी आजूबाजूच्या चाळीच्या गच्चीवरून जबरदस्त दगडफेक केली. त्यामुळे बघताबघता दंगल पेटली आणि पुढचे रामायण घडले. या दगडफेकीत रमेश देवरूखकर हा पँथर शहीद झाला. या दंगलीच्या निषेधार्थ दहा जानेवारीला निघालेल्या मोर्चावरसुद्धा तुफान दगडफेक झाली. भागवत जाधवसारख्या लेखक-कवीवर इमारतीच्या गच्चीवरून दगड टाकून त्याचा खून करण्यात आला. डांगळेंच्या मांडणीनुसार या दंगलीमुळेच पुढे दलित पँथरमध्ये फूट पडली. म्हणून पँथरच्या इतिहासात वरळीची दंगल महत्त्वाची ठरते. रिपब्लिकन पक्षाने आधीच रामराव आदिकांना पाठिंबा जाहीर केला होता. दलित पँथरसुद्धा आदिकांना पाठिंबा देईल, असे वातावरण होते. या मुद्यावरून पँथरमध्ये एकमत नव्हते. राजा ढाले, ज. वि. पवार पाठिंब्याच्या बाजूने होते तर बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ पाठिंब्याच्या विरोधात होते. ढालेंनी काँग्रेसशी डील केले, अशी कुजबुज होती. याचा परिणाम पँथर फुटण्यात झाला. याबद्दल डांगळे ठाम विधान करत

नाही. आता १९७४ सालच्या घटनेबद्दल २०२१ साली लिहिताना डांगळेंनी अधिक माहिती आणि परिस्थितीजन्य पुरावे गोळा करून ठाम विधान करणे अपेक्षित आहे.

या प्रकरणासारखी पुढची दोन महत्त्वाची प्रकरणे म्हणजे चौदावे आणि पंधरावे प्रकरण. यात लेखकाने दलित पँथर का फुटली यांचे विवेचन केले आहे. ज.वि.पवार , राजा ढाले, नामदेव ढसाळ यांच्याप्रमाणे अर्जुन डांगळे महत्त्वाचे नेते शिवाय संस्थापक-सदस्य असल्यामुळे त्यांच्या विवेचनाला महत्त्व आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे फुटीला वरळीची लोकसभा निवडणूक हा महत्त्वाचा घटक होता, त्यातही तेव्हा केलेली डील; यामुळे धुसफुस वाढत गेली. या जोडीला ढालेला अपेक्षित असलेला आंबेडकरवाद आणि ढसाळला अपेक्षित असलेला मार्क्सवाद, हासुद्धा महत्त्वाचा तात्त्विक मुद्दा होताच. याच काळात नामदेवने 'मी हाडाचा कम्युनिस्ट आहे' असे जाहीर केले. स्वतः डांगळेंच्या मते 'पँथरच्या फुटीची बीजं तिच्या जन्मातच होती' (पृ. १५७). पँथरच्या महत्त्वाच्या नेत्यांवर वेगवेगळ्या राजकीय विचारसरणीचा प्रभाव होता. राजा ढाले समाजवादी विचारांच्या प्रा. मे. पुं. रेगेसरांच्या प्रभावाखाली होता तर नामदेव ढसाळ कम्युनिस्टांच्या जवळ होता. तेव्हा कम्युनिस्टांना, समाजवाद्यांना काँग्रेसला आणि रिपब्लिकन पक्षाला पँथर आपल्याबरोबर असावी, अशी इच्छा होती. डांगळे नमूद करतात त्याप्रमाणे अशा स्थितीत नामदेव ढसाळने कम्युनिस्टांच्या मदतीने लिहिलेला पँथरचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. राजा ढालेला जाहीरनाम्याचा 'लाल रंग' मान्य होणे शक्यच नव्हते. त्याने 'नवाकाळ'मधून 'जाहीरनामा की नामा जाहीर'? असे दोन दीर्घ लेख लिहून हल्ला केला. यातून फुटीची सुरुवात झाली. फूट पडू नये यासाठी केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले आणि नामदेवने 'इतिहासाची चक्रे उलटी फिरवू नका' अशी पुस्तिका लिहून राजाला उत्तर दिले. (डांगळेंनी अनेक महत्त्वाचे दस्तऐवज परिशिष्टांत दिलेत यामुळे अभ्यासकांची सोय झाली आहे. डांगळेंनी ढालेंचे 'नवाकाळ' मधील दोन लेख दिले आहेत. पण हे लेख कोणत्या दिवशी प्रसिद्ध झाले, ही महत्त्वाची माहिती दिली नाही). नंतर 'राजा ढालेने पँथरच्या नागपूर अधिवेशनात नामदेव ढसाळची हकालपट्टी केली' (पृ. १६७). अर्थात याअगोदरच नामदेवने राजाला आणि ज. वि. पवारांना पँथरमधून काढून टाकले होते, हेसुद्धा डांगळे नमूद करतात.

पँथरच्या फुटीनंतर एकुणातच पँथरच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. शेवटी ७ मार्च १९७७ रोजी (म्हणजे आणीबाणी सुरू असताना) राजा ढालेंनी एका

पत्रकार परिषदेत पँथर बरखास्तीची घोषणा केली आणि 'मास मूव्हमेंट' ही नवी संघटना सुरू केली. या पत्रकार परिषदेला ज. वि. पवार, गंगाधर गाडे, दयानंद म्हस्के, रामदास आठवले वगैरे उपस्थित होते याचा खरा अर्थ असा की उपस्थित नेत्यांना पँथर बरखास्तीचा निर्णय मान्य होता. पँथरच्या इतर काही नेत्यांनी २८ एप्रिल १९७७ रोजी बीडीडी चाळीत 'भारतीय दलित पँथर' स्थापन केली. या संघटनेच्या अध्यक्षपदी प्रा. अरुण कांबळे होते. डांगळे दाखवून देतात त्याप्रमाणे 'भारतीय दलित पँथरच्या नेतृत्वाचा आणि संघटनात्मक बळकटीचा आधार हा मुख्य म्हणजे त्यांनी केलेली 'मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरा'ची मागणी आणि त्यासाठी केल्या जाणाऱ्या लढ्याची घोषणा होय (पृ. १८५). डांगळेंनी पुढच्या प्रकरणांत या घटनांची खोलात जाऊन चर्चा केली आहे. हे स्वाभाविकच आहे. त्यांच्या पुस्तकाचा विषय 'दलित पँथर' हा आहे.

दलित पँथर स्थापन झाल्यापासून आजपर्यंत तिच्याबद्दल लेखन होत आहे. अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, राजा ढाले तसेच नामदेव ढसाळच्या लेखनाचा हेतू स्वतःची बाजू समाजासमोर मांडणे हा असल्यामुळे यात वस्तुनिष्ठ चर्चा फारशी आढळत नाही. मात्र काही महत्त्वाच्या घटनांबद्दलचे तपशील समोर येतात. उदाहरणार्थ, डांगळेंनी वरळीची दंगल आणि पोटनिवडणूकीबद्दल दिलेली माहिती महत्त्वाची आहे. शिवाय डांगळे नमूद करतात 'दिनेश लखमापूरकरां'नी 'आकार' नावाचा दलित बौद्ध कवींचा प्रातिनिधिक काव्यसंग्रह १९६७ साली प्रकाशित केला होता. दलित कवितेतील हा पहिला संग्रह होय (पृ. ३७). ही माहिती जशी जमेची बाजू आहे तशीच दुसरी नकारात्मक बाजू म्हणजे डांगळे या पुस्तकात अनेक संदर्भ उडतउडत देतात. त्याबद्दल मराठी वाचकांना अधिक माहिती देणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ 'हंगेरी, तिबेट, इम्रेनाजची फाशी' अशा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर या दोन पक्षात संघर्ष होता' (पृ. २५२ ). या वाक्यात आलेले हंगेरी, इम्रेनाजची फाशी वगैरे संदर्भ मराठी वाचकांना कितपत समजतील? या घटना/ व्यक्तींबद्दल जर लिहायचं नसेल तर 'काही राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय घटनांबद्दल या दोन पक्षांत संघर्ष होता' असे मोघम लिहिता आले असते.

काही ठिकाणी डांगळे वस्तुनिष्ठ अभ्यासकाच्या धर्माला जागलेले नाहीत, असे खेदाने नमूद करावे लागते. ते पृष्ठ कमांक १८१ वर लिहितात 'आणीबाणीच्या काळात आणि नंतर राजकीय वर्तुळात आणि पत्रकारांमध्ये अशीही चर्चा होती की, 'फॉरिन फडिंग प्रकरणी चौकशीचा ससेमिरा टाळणे,

हे एक पँथरच्या बरखास्तीचे कारण होते. यासंबंधी अनेक संघटनांची नावे वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली होती आणि यात ‘दलित पँथर’चेही नाव होते असे वाचल्याचे अनेक जण सांगतात.’ २०२१ साली प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकात असा मोघम उल्लेख शोभत नाही. डांगळेंनी एवढया वर्षात या उल्लेखाची खातरजमा करून घेणे अपेक्षित आहे. ‘फॉरिन फंडिंग’चा आरोप फार गंभीर आहे. स्वतः पुरावे गोळा करण्याऐवजी ते जबाबदारी ज. वि. पवारांवर टाकतात. डांगळेंनी पृष्ठ १७९ वर लिहिले आहे ‘त्या काळात (म्हणजे आणीबाणीच्या) शिवसेनेला ‘वसंतसेना’ नाव पडले होते.’ हा उल्लेख बरोबर नाही. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना त्यांनी मुंबईच्या कामगारक्षेत्रावर असलेला कम्युनिस्टांचा प्रभाव घालवण्यासाठी भांडवलदारांच्या मदतीने शिवसेनेला (स्थापना १९६६) भरपूर मदत केली होती. म्हणून शिवसेनेला त्या काळी ‘वसंतसेना’ म्हणत असत. दुसरे म्हणजे वसंतराव नाईक २१ फेब्रुवारी १९७५ पर्यंत मुख्यमंत्रीपदी होते आणि आणीबाणी लागू झाली ती २५ जून १९७५ रोजी. तेव्हा शंकरराव चव्हाण मुख्यमंत्रीपदी होते.

या महत्त्वाच्या पुस्तकाबद्दल प्रकाशकांवर दोन कारणांसाठी नाराजी व्यक्त करावी लागते. एक म्हणजे ढिसाळ संपादन. या पुस्तकातील एकच मजकूर/ माहिती अनेक ठिकाणी पुन्हा पुन्हा आली आहे. जर एखाद्या अनुभवी संपादकाने या पुस्तकाच्या हस्तलिखितावर नजर टाकली असती तर यातील पुनरुक्तीचा दोष गेला असता. दुसरं म्हणजे या पुस्तकातील प्रकरणांचा क्रम असमाधानकारक आहे. प्रकरण सातवे (युवक आघाडी: सिद्धार्थ वसतिगृहात स्थापना) आणि प्रकरण आठवे ( युवक आघाडी : घटनाक्रम-वाटचाल ) ही प्रकरणं वर यायला हवी होती. शिवाय अर्जुन डांगळेंच्या या ग्रंथात अमेरिकेतील ‘ब्लॅक पँथर’ बद्दल फारसे विवेचन नाही.

असे असमाधान बाजूला ठेवत या पुस्तकाला सामोरे जावे. नंतर लक्षात येते की अर्जुन डांगळेंनी तपशिलांचा, दुर्मीळ माहितीचा खजिना वाचकांसमोर उघडला आहे. असे पुस्तक अर्जुन डांगळेंसारखी त्यात सहभागी झालेली व्यक्तीच लिहू शकते. म्हणूनच अशा पुस्तकांचे स्वागत केले पाहिजे.

**संदर्भ**

१. डांगळे अर्जुन (२०२१) : *दलित पँथर अधोरेखित सत्य*, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

# भारतामधील दारिद्रय : संकल्पना, उपाय आणि पर्याय


**कृष्णन गोपाळ नंदेला**

प्रभारी प्राचार्य,
सहयोगी प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख,
डॉ. टी.के. टोपे कला आणि वाणिज्य रात्र महाविद्यालय,
परळ, मुंबई ४०० ०१२.
gestktiqac@gmail.com

**दारिद्र्यरेषेची संकल्पना**

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये दारिद्र्याची संकल्पना मांडताना फक्त ‘अन्न’ या मूलभूत गरजेचा विचार केला जात होता. अर्थात, अन्नाचा विचार करताना अन्न म्हणजे अन्नातून मिळणारी प्रतिदिन एका व्यक्तीला आवश्यक असलेली उर्जा. या उर्जेचे मापन किलो-कॅलरीमध्ये केले जाते. ग्रामीण भागामध्ये एका व्यक्तीला २४०० किलो-कॅलरी प्रतिदिन तर शहरी भागामध्ये २१०० किलो-कॅलरी प्रतिदिन उर्जा मिळाली तर ती व्यक्ती दारिद्र्यरेषेच्या वरती आहे, असे समजले जाते. कॅलरी उपभोगाच्या आधारे, १९७३-७४मध्ये अखिल भारतीय दारिद्र्यरेषेचे मापन करताना ग्रामीण भागामधील दरडोई उत्पन्न रुपये ३९.६३ प्रति माह तर शहरी भागामध्ये रुपये ५६.६४ प्रति माह असे निश्चित करण्यात आले होते. वर्ष २००४-०५ मध्ये किंमत-पातळी विचारात घेता, ही अट रुपये ३५६.३० प्रति-माह ग्रामीण भागासाठी तर रुपये ५३८.६० शहरी भागासाठी निश्चित करण्यात आली होती. वर्ष २००९-१०मध्ये दारिद्र्यरेषेमध्ये सुधारणा करण्यात आली आणि या रकमा प्रत्येकी रुपये ६७२.८० आणि रुपये ८५९.६० ठरवण्यात आल्या.

**दारिद्र्याचे प्रमाण**

विविध वर्षांमध्ये दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या भारतामधील व्यक्तींची टक्केवारी तक्ता क्रमांक ०१ मध्ये देण्यात आली आहे.

*भारताच्या योजना आयोगाने स्थापित केलेल्या सुरेश तेंडुलकर समितीने दारिद्र्यरेषेसंबधित अहवाल वर्ष २००९ मध्ये सादर केला. भारतामध्ये प्रथमतः दारिद्र्यरेषेच्या मापनामध्ये आरोग्य व शिक्षणावरील खर्च विचारात घेण्यात आला. वरील तक्त्यामधील वर्ष १९९३-९४* आणि वर्ष २००४-०५* चे आकडे सुरेश तेंडुलकर समितीने दिल्याप्रमाणे आहेत.

**दारिद्र्य रेषेखालील टक्केवारी लोकसंख्या**

| वर्ष | ग्रामीण/शहरी दारिद्र्य रेषा | ग्रामीण | शहरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| **1973-74** | 49.63/56.64 | 56.4 | 49.0 | 54.9 |
| **1983-84** | 89.50/115.65 | 45.7 | 40.8 | 44.5 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **1993-94** | 205.84/281.35 | 37.3 | 32.4 | 36.0 |
| **1993-94*** | | 50.1 | 31.8 | 45.3 |
| **1999-2000** | 327.56/454.11 | 27.09 | 23.62 | 26.1 |
| **2004-05** | | 28.3 | 25.7 | 27.5 |
| **2004-05*** | 446.68/578.80 | 41.8 | 25.7 | 37.2 |
| **2009-10** | 672.80/859.60 | 33.8 | 20.9 | 29.8 |
| **2020-21** | Niti Aayog's MPI (H&A) | 25.01% | 47.13% | 0.118 |

**बहुआयामी दारिद्र्याचा निर्देशांक (मल्टी-डायमेंशनल पॉवर्टी इंडेक्स)**

१९९७ च्या मानव विकास अहवालामध्ये 'मानवी दारिद्र्या'ची संकल्पना मांडण्यात आली आणि या अहवालामध्ये मानवी दारिद्र्याचा निर्देशांक सादर करण्यात आला (HPI). मानवी जीवनामधील तीन महत्त्वाच्या उपेक्षांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. ह्या तीन उपेक्षा म्हणजेच : दीर्घ आणि निरोगी जीवन, शिक्षण आणि चांगले जीवनमान. तर UNDP ने सादर केलेल्या १९९७ च्या मानव विकास अहवालानुसार भारतामधील HPI २८% होता.

वर्ष २०१० मध्ये UNDP ने HPI च्या ऐवजी बहुआयामी दारिद्र्याचा निर्देशांक (MPI) सादर केला. दरडोई दारिद्र्य (H) गुणिले दरिद्र्याची तीव्रता (A) बरोबर MPI असे समीकरण सादर करण्यात आले. या समीकरणामध्ये दरडोई संख्या (Headcount) म्हणजे बहुआयामी दारिद्र्यामध्ये असलेल्या लोकांची टक्केवारी तर बहुआयामी दारिद्र्यामध्ये असलेल्या कुटुंबाने अनुभवलेल्या सरासरी उपेक्षांची संख्या म्हणजेच दारिद्र्याची तीव्रता (A). दारिद्र्याच्या तीव्रतेचे तीन आयाम आहेत : आरोग्य, शिक्षण आणि जीवनमान होय. हे तीन आयाम १० निर्देशकांमध्ये प्रतिबिंबित होतात. एकूण गुण १००% असून, प्रत्येक आयामाचे वजन ३३.३३ % आहे. शिक्षण आणि आरोग्याचे प्रत्येकी दोन निर्देशक आहेत आणि त्यांचे प्रत्येकी वजन १६.७% किंवा ५/३ असे आहे. जीवनमान आयामाचे सहा निर्देशक आहेत आणि प्रत्येक निर्देशकाचे वजन ५.६% (३३.३३ ÷ ६ = ५.६) अर्थात ५/९.

**शैक्षणिक आयामाचे दोन निर्देशक पुढीलप्रमाणे आहेत :**

कोणालाही ०५ वर्षाचे शालेय शिक्षण प्राप्त झाले नाही आणि कमीतकमी एका शालेय वयोगटामधील (इयत्ता ०८ पर्यंत) असलेल्या मुलाची नोंदणी शाळेमध्ये झालेली नाही.

तसेच आरोग्यविषयक आयामाचे दोन निर्देशक पुढीलप्रमाणे आहेत :

कुटुंबातील कमीतकमी एक व्यक्ती कुपोषित आहे आणि एक किंवा अधिक मुलांचा मृत्यू झाला आहे.

जीवनमानाची सहा निर्देशके पुढीलप्रमाणे आहेत :

- घरामध्ये इलेक्ट्रिसिटी नाही.
- स्वच्छ पेयाचे पाणी उपलब्ध नाही.
- पर्याप्त सांडपाणी व्यवस्था उपलब्ध नाही.
- घरातील फरशी घाण आहे.
- कुटुंब घाणेरडया इंधनाचा प्रयोग करते (शेण, लाकूड किंवा कोळसा).
- कुटुंबाकडे मोटर गाडी किंवा सामान वाहन नाही आणि पुढीलपैकी कोणत्याही एका माणसाची मालकी आहे : सायकल, मोटरसायकल, रेडियो, रेफ्रीजरेटर, टेलिविजन किंवा टेलिफोन.

**बहुआयामी दारिद्र्यामधील कुटुंबाची ओळख स्थापित करणे.**

प्रत्येक कुटुंबाचे उपेक्षासंबधित गुण जोडले जातात आणि कुटुंबसंस्थांची एकूण उपेक्षा ‘c’ प्राप्त केली जाते. बहुआयामी दारिद्र्यामध्ये असलेल्या कुटुंबांचे विभाजन तीन वर्गामध्ये केले आहे:

जर ‘c’ चे मूल्य ३३.३३ % किंवा अधिक असेल तर ते कुटुंब बहुआयामी दारिद्र्यामध्ये आहे, असे मानले जाते.

जर ‘c’ चे मूल्य २० % किंवा अधिक परंतु ३३% पेक्षा कमी असेल तर त्या कुटुंबाचे बहुआयामी दारिद्र्यामध्ये स्थित्यंतर होण्याची शक्यता आहे, असे मानले जाते.

जर ‘c’ चे मूल्य ५०% पेक्षा अधिक असेल तर ते कुटुंब अत्याधिक बहुआयामी दारिद्र्यामध्ये आहे, असे मानले जाते.

दरडोई प्रमाण (H) एकूण लोकसंख्येमध्ये असलेल्या बहुआयामी दारिद्र्यामधील लोकांची टक्केवारी आहे:

संभाषित

$$H = \frac{q}{n}$$

या समीकरणामध्ये, $q$ = बहुआयामी दारिद्र्यामधील लोकांची संख्या आणि $n$ = एकूण लोकसंख्या.

दारिद्र्याची तीव्रता (A) म्हणजे बहुआयामी दारिद्र्यामध्ये असलेल्या कुटुंबाने अनुभवलेल्या सरासरी उपेक्षांची संख्या. तीव्रतेचे गुण प्राप्त करताना फक्त दारिद्र्यामध्ये असलेल्या कुटुंबाची उपेक्षा संख्या जोडली जाते आणि ह्या संख्येला एकूण दारिद्र्यामध्ये असलेल्या लोकांच्या संख्येने भागिले जाते. याप्रमाणे दारिद्र्याची तीव्रता प्राप्त केली जाते:

$$A = \sum_{i}^{q} c/q$$

वरील समीकरणामध्ये 'c' गरीब कुटुंबांनी अनुभवलेल्या उपेक्षा दर्शवितो.

MPI = HA म्हणजे बहुआयामी दारिद्र्यामध्ये असलेल्या लोकांची एकूण टक्केवारी गुणिले दारिद्र्याच्या तीव्रतेची टक्केवारी = बहुआयामी दारिद्र्याचा निर्देशांक होय.

**२०२१ चे भारतामधील बहुआयामी दारिद्रय**

वर्ष २०२१ च्या जागतिक MPI अहवालानुसार भारताचा क्रमांक १०९ राष्ट्रांपैकी ६६ असा होता. ह्याचा अर्थ असा की ६५ देशांमध्ये MPI भारताच्या तुलनेत कमी आहे किंवा त्यांची परिस्थिती चांगली आहे. भारताच्या नीतिआयोगाने प्रकाशित केलेल्या २०२१ च्या MPI अहवालानुसार, आपले MPI मूल्य पुढीलप्रमाणे आहे :

दरडोई प्रमाण (H) = २५.०१% आणि दारिद्र्याची तीव्रता (A) = ४७.१३%, तर MPI = २५.०१ × ४७.१३ = ०.११८. याचा अर्थ असा की, २०२१मध्ये ११.८ टक्के भारतीय बहुआयामी दारिद्र्यामध्ये होते. बिहारमध्ये MPI चा स्कोर २६.५% होता तर केरळ चा स्कोर फक्त ०.३% होता. केरळ राज्याचे MPI मूल्य H = ०.७१% आणि A = ३९.०२% = ०.३% असे प्राप्त होते तर बिहारच्या बाबतीत हे आकडे असे होते : H = ५१.९१% × ५१.०२ = २६.५%.

**दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम आणि उपाय :**

भारतामध्ये दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमांची सुरुवात १९७० च्या दशकामध्ये झाली. स्मॉल फार्मर्स डेव्हलपमेंट एजन्सी (SFDA), मार्जिनल फार्मर्स & ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट एजन्सी (MFADA), ड्रोट प्रोन एरिया प्रोग्राम (DPAP), फूड फोर वर्क प्रोग्राम (FWP) यासारख्या कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी केंद्र सरकारने केली आहे. या सर्व कार्यक्रमांचा दृष्टिक्षेप ग्रामीण माणसावर होता. कारण १९७० च्या दशकात भारत प्रामुख्याने एक ग्रामीण राष्ट्र होते. तथापि हे सर्व कार्यक्रम सर्वव्यापी नव्हते आणि यांच्यामध्ये संपूर्ण भारतीय ग्रामस्थांचा समावेश होत नव्हता.

१९७० च्या दशकाच्या शेवटी भारत सरकारने एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) आखला. याचबरोबर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना आणि ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना यांचीसुद्धा अंमलबजावणी केली. १९८९ मध्ये या सर्व कार्यक्रमांना एकत्रित करून एक नवीन कार्यक्रम आखला गेला. या कार्यक्रमाचे नाव होते जवाहर रोजगार योजना (JRY). ट्रेनिंग ऑफ रूरल यूथ फॉर सेल्फ एम्प्लॉयमेंट (TRYSEM) यासारखा कौशल्य विकास कार्यक्रमसुद्धा आखला गेला. यावेळी कार्यरत असलेली एम्प्लॉयमेंट ॲश्युरंस योजना २००१मध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेमध्ये विलीन करण्यात आली आणि या नवीन कार्यक्रमाद्वारे बेरोजगार ग्रामस्थांना १०० दिवसांचा अकुशल रोजगार देण्याची हमी देण्यात आली. वर्ष २००६ मध्ये, भारत सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) अंमलात आणली. या कार्यक्रमामधून ग्रामीण भारतामधील प्रत्येक कुटुंबाला १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली.

**दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांचे मूल्यांकन**

दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांची अंमलबजावणी करून ५० पेक्षा अधिक वर्षे झाली आहेत. उपलब्ध माहितीच्या आधारे असे सांगता येईल की, अजूनही भारतामध्ये दारिद्र्य सार्वत्रिक रूप धारण करून आहे. एकेकाळी ५०% पेक्षा अधिक लोकसंख्या दारिद्र्यामध्ये जगत होती तर वर्तमान भारतामध्ये २५% लोकसंख्या दारिद्र्यामध्ये जगत आहे. अर्थात, मागील ५० वर्षांमध्ये भारतामधील दारिद्र्य फक्त ५०% ने कमी झाले

आहे. वर्तमान भारतामध्ये प्रत्येक चौथी व्यक्ती दारिद्र्यामध्ये जगत आहे तर प्रत्येक दहावी व्यक्ती बहुआयामी दारिद्र्यामध्ये जगत आहे. दारिद्र्य शोधण्यासाठी दूर जावे लागत नाही. तर देशामधील सर्व लहान मोठ्या शहरांमध्ये रस्त्याच्या कडेला बांधलेल्या झोपडपट्ट्या, गटारांवर, नाल्यांवर आणि डोंगरावर झालेले अतिक्रमण, पायवाटांवर होणारे अतिक्रमण रेल्वे स्टेशनच्या बाहेर उघड्यावर राहाणाऱ्या करोडो लोकांचा विचार केला की दारिद्र्य आपल्यापुढे आ करून उभे राहाते. शहरांमधील जवळजवळ ५०% पेक्षा अधिक विभाग गलिच्छ वस्त्यांनी गजबजलेला बघायला मिळतो. तर दारिद्र्याचा प्रश्न अजून सुटलेला नाही, असे नक्कीच म्हणता येईल.

**दारिद्र्यावरील पर्यायी उपाय**

मागील ५० वर्षांपेक्षा अधिक वर्षांमध्ये आपण कॅलरी किंवा प्राणी दारिद्र्य निर्देशकावरून मनुष्य दारिद्र्य निर्देशाकडे (HPI) आलो आहोत. आता तर आपण बहुआयामी दारिद्र्याकडे बघू लागलो आहोत. तर नक्कीच दारिद्र्याकडे बघण्याच्या दृष्टिकोणामध्ये क्रांतिकारी बदल झाला आहे. परंतु दारिद्र्याचा प्रश्न अजून मात्र सुटलेला नाही. म्हणून प्रश्न पडतो की आपल्या दृष्टिकोणामध्ये नक्कीच कुठे तरी कमतरता असेल. संपन्न असलेल्या पाश्चिमात्य देशांमध्ये दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम न करता दारिद्र्याचा प्रश्न सोडवला गेला आहे असे दिसते. तर आपल्याच देशामध्ये, केरळ आणि तमिलनाडूमध्ये दारिद्र्य जवळजवळ नष्ट झाल्यासारखे दिसत आहे. वरील बाबींना विचारात घेता, जे काही प्रश्न माझ्या मनामध्ये उभे राहात आहेत ते पुढे दिले आहेत :

**दारिद्र्याचा प्रश्न सूक्ष्मलक्षी आहे का समग्रलक्षी आहे?**

मला असे वाटते की दारिद्र्याचा प्रश्न सूक्ष्मलक्षी असून त्याला समग्रलक्षी आयाम आहेत. शहरामधील म्युनिसिपालिटी किंवा ग्रामीण भागामधील ग्रामपंचायत आपल्या देशामधील सूक्ष्म-राजकीय किंवा सूक्ष्म-आर्थिक एकक आहे. या एककाकडे त्यांच्या लोकसंख्येची पूर्ण माहिती उपलब्ध असते किंवा असली पाहिजे. तर राज्य किंवा केंद्र सरकारने नियोजन करण्याच्या ऐवजी जर म्युनिसिपालिटी किंवा ग्राम पंचायतीने दारिद्र्य निर्मूलनाचे आणि रोजगार निर्मितीचे कार्यक्रम आखले तर ते अधिक वस्तुनिष्ठ व परिणामकारक ठरतील. या स्थानिक सरकारी संस्थांना

स्वायत्तता दिली आणि आवश्यक तेवढे वित्त बळ पुरविले तर दारिद्र्य आणि बेरोजगारीचा प्रश्न अधिक कार्यक्षमरीत्या सुटेल.

**आपला समाज खऱ्या अर्थाने एकात्मिक आहे की नाममात्र एकात्मिक आहे?**

भारतामधील ग्रामीण आणि शहरी समाज धर्मांधतेचे, चाली-रीतींचे आणि रूढी-परंपरेचे प्रश्न वगळता कुठेही एकात्म दिसत नाहीत. आज राष्ट्रवादापेक्षा सामाजिक निष्ठेची अधिक गरज आहे. जेव्हा दारिद्र्याचा, कुपोषणाचा, बेरोजगारीचा, निकृष्ट आर्थिक आणि सामाजिक पायाभूत व्यवस्थेचा प्रश्न असतो तेव्हाच फक्त आपण सहिष्णु असतो, ही आपल्या समाजातील एक समस्याच आहे. त्यामुळे भारतामधील लोकांना म्युनिसिपालिटी आणि ग्राम पंचायत पातळीवर संघटित होण्याची गरज आहे. आपल्या समस्या कोणत्या आहेत ते समजून घेणे गरजेचे आहे. त्यांच्यासाठी स्थानिक निदान शोधणे आवश्यक आहे.

**भरभराटीच्या रेषेची व्याख्या करण्याची गरज आहे का?**

मागील अनेक वर्षांमध्ये आपण दरिद्र्याची व्याख्या आणि पुनर्व्याख्या करत आलो आहोत. आता वेळ आली आहे समृद्धीच्या रेषेची व्याख्या करण्याची. आपल्या देशामध्ये समृद्ध असलेल्या लोकांची टक्केवारी किती आहे, हे माहीत असणे गरजेचे आहे. असे केले तर आपण विविध पातळीवर असलेल्या सरकारी संस्थाना समृद्धी प्राप्त करण्यासाठी उत्तेजन देऊ शकू आणि त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसेसुद्धा देऊ शकू. आपल्या देशामधील लोकसुद्धा समृद्धी प्राप्त करण्यासाठी पुढे सरसावतील.

**संदर्भ**


१. दत्त गौरव आणि महाजन अश्वानी (७२ वी आवृत्ती, २०१६) : भारतीय अर्थव्यवस्था एस चाँद पब्लिकेशन, ISBN 978-93-525-3129-5.

३. पूरी वी. के. आणि मिश्र एस. के. (३१ वी सुधारित आवृत्ती) : भारतीय अर्थव्यवस्था हिमालय पब्लिशिंग हाउस, ISBN: 978-93-5097-659-3.

४. नीती आयोग इंडिया बेसलाइन रिपोर्ट (२०२१).

५. ग्लोबल MPI (२०२१) , UNDP-OPHI report.

# पुस्तक परीक्षण


संशोधन

# जगण्याची चिकित्सा करणारे आत्मकथन : *मी असा जगलो*

**वासंती दामले**

माजी प्राध्यापक, इतिहास विभाग
मुंबई विद्यापीठ ,मुंबई.
vasdamle@gmail.com

समीक्षा




(परीक्षित पुस्तक : *मी असा जगलो*, लेखक: भालचंद्र मुणगेकर, प्रकाशन: लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्रकाशन वर्ष: मार्च २०२१, मुंबई, पृ.३३३, मूल्य: रु.५००)

*मी असा जगलो* हे डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे आत्मकथन आहे. त्यांच्यामते ते त्यांचे 'आत्मपरीक्षण' आहे. जीवन जगत असताना, त्यांना जसे अनुभव येत गेले व जशी माणसे भेटत गेली त्यामुळे आणि वाचन-चिंतनातून स्वत:ची अशी मूल्यसारणी घडत गेली. त्यांनी स्वीकारलेली ही मूल्ये प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात व सर्व दलित, वंचित समूहाच्या बाजूने संघर्ष करण्याची होती. मुणगेकरांच्या मते स्वत:ची मेहनत आणि आरक्षण धोरण यांमुळे त्यांची सामाजिक स्थिती सुधारत गेली; राहणीमान सावकाश उंचावत गेले, या सबंध जडणघडणीचा उलगडा त्यांना या लेखनप्रवासात झाला, या अर्थाने त्यांचे हे आत्मकथन त्यांना 'आत्मपरीक्षण' वाटते.

आत्मकथनाच्या पहिल्या भागात मुंबईच्या 'शिरोडकर हायस्कूल' मधून झालेले शालेय शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण सुरू असताना वडिलांना आर्थिक हातभार लावावा म्हणून मिळवलेली 'रिझर्व बँकेची'

संभाषित

नोकरी , 'सिद्धार्थ रात्र महाविद्यालया'त प्रवेश, हॉस्टेलची सोय झाल्याने मामांकडे झोपडपट्टीत राहण्यापासून झालेली सुटका, लेक्चरर होण्यासाठी जिद्दीने बीए, एमएचा केलेला अभ्यास हा सर्व प्रारंभीचा संघर्ष येतो. या सगळया घटनांविषयी वाचताना लक्षात येते ती मुणगेकरांना असलेली साहित्याची ओढ व विविध राजकीय विचारसरणीबद्दल असलेला वैचारिक मोकळेपणा! भोवतालाविषयी जाणून घेणे, या बालसुलभ कुतूहलातून अनेक अनुभवांना ते मोकळेपणे सामोरे जातात. कदाचित त्याचमुळे पुढे प्रस्थापिताचा भाग होताना किंवा नंतर कॉंग्रेसचे सभासदत्व स्वीकारताना, या कुतूहलाचा त्या निर्णयप्रक्रियेत मोठा हिस्सा असावा; असे हे आत्मकथन वाचताना जाणवत राहते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरूपद स्वीकारल्यानंतर पुढे प्रस्थापित व्यवस्थेत अनेक पदांवर त्यांना विचारणा झाली. योजना आयोगाचे सदस्य व राज्यसभेचे खासदार म्हणून त्यांची नियुक्ती झाली. कॉंग्रेस पक्षाचे सभासद बनण्याचे आमंत्रण मिळाले. डॉ. मुणगेकरांनी तरुणवयापासून जी समाजवादी विचारसरणी स्वीकारली होती, त्यात कॉंग्रेसच्या विरुद्ध लढण्याची जबरदस्त प्रेरणा लोहियांनी तरुणवर्गाला दिलेली होती. जवळजवळ पन्नाशीपर्यंत मुणगेकर त्यांच्याशी एकनिष्ठ राहिले होते. त्यामुळे कॉंग्रेस पक्षाच्या सभासदत्वासाठी विचारणा झाल्यावर निर्माण झालेले आंतरिक द्वंद्व येथे अनुभवता येते.

कुटुंब, शिक्षण आणि चळवळ या तीनही स्तरावरील घडामोडी परस्परांना प्रभावित करत डॉ. मुणगेकर यांचे व्यक्तिमत्त्व साकारल्याचा प्रत्यय वाचनातून येत राहतो. उमेदीच्या काळात ते रिझर्व बँकेतील मित्र राम सातपुते यांच्यामुळे, 'युवक क्रांती दला'च्या निकट आले. पूर्वी त्यांचे श्रद्धास्थान बॅरिस्टर नाथ पै हे होते पण मित्रांच्या सान्निध्यात व युक्रांदमधील सक्रीय सहभागामुळे त्यांच्या श्रद्धास्थानात लोहियांसकट अनेक लोकांची भर पडत जाते. दलित समाजाच्या समजाच्या कक्षा, जातीपुरत्या सीमित न राहता रुंदावत गेलेल्या दिसतात. कुणाहीविरुद्ध होणाऱ्या अन्याय व अत्याचाराची चीड त्यांना अस्वस्थ करू लागते. भारतात निम्नजाती व वंचित वर्ग हे बहुतेक वेळा एकच असतात, याचे भान तीव्र होत जाते. मुणगेकरांना हवे तसे जीवन, म्हणजे वैचारिक चर्चा व कृती, हे दोन्ही युक्रांदमधील सहभागामुळे मिळू लागते. युक्रांदमधील चर्चांमुळे व एम.ए.च्या वर्गातील अर्थशास्त्रीय शिक्षणामुळे त्यांना देशात

संभाषित

काय चालले आहे व जगातही काय चालले आहे याची जाणीव होऊन ते समजून घेण्याचे कुतूहल वाढू लागते. तेही म्हणतात की १९६६-१९६९ ही जडणघडणीच्या दृष्टीने महत्त्वाची वर्षे होती. सामाजिक चळवळी, राजकीय चर्चा, सिनेमा-नाटक बघणे या सर्वांमुळे सुसंस्कृत व प्रगल्भ बनण्यासाठीचे एक्सपोजर त्यांना या काळात मिळाले. युक्रांदमधील सहभागामुळेच आपल्या पहिल्या कन्येचे नाव ते 'क्रांती' ठेवतात, हा उल्लेख विशेष आहे. वडिलांच्या आग्रहामुळे १९७१ साली लग्न होते. लग्नामध्ये रुसवेफुगवे होतात पण त्याचा दोष काही प्रमाणात मुणगेकर स्वतःकडेही घेतात व नकळत पुरुषप्रधानता अंगात कशी मुरलेली असते, हेही कबूल करतात. पुरुषप्रधानता अंगी मुरली असली तरी बदलायला पाहिजे, ही जाणीव असल्याने पत्नी व पुढे मुलांशीही मोकळेपणाचे वातावरण निर्माण करतात. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर म्हणजे घर बदलणे, नोकरी बदलणे इत्यादी निर्णय पत्नीशी व मोठे झाल्यावर मुलांशी चर्चा करून घेतलेले असतात. ज्या आबांनी त्यांना शिकवण्यासाठी कष्ट घेतले त्यांना अतिशय समजुतीने सांभाळतात. उदा. आबा मुंबईला शक्यतो दारू पीत नसत. पण दारूसाठी एकदा बेचैन झाल्याचे बघितल्यावर, मुणगेकर स्वतः घराबाहेर पडून त्यांना दारू आणून देतात. महाविद्यालयात अध्यापन करण्याची त्यांची इच्छा पत्नीच्या सहकार्यामुळे पूर्ण होते. कॉलेजमध्ये पूर्ण तयारीनिशी गेल्याने त्यांचे शिकवणे विद्यार्थ्यांना आवडू लागते. त्यासाठी त्यांनी वर्षभर कशी मेहनत घेतली ते शिक्षक होऊ इच्छिणाऱ्यांनी मुळातूनच वाचावे. या सर्व काळात विंचवाच्या पाठीवर बिऱ्हाड असल्यासारखे मुणगेकरांना आपले राहते बिऱ्हाड सतत बदलत राहावे लागते. कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे जास्त किंमतीचे घर घेणे शक्य नसते आणि महाविद्यालयीन शिक्षक म्हणून असणाऱ्या पगारामुळे ते अल्प उत्पन्नगटात बसत नव्हते. अशा वेळी सरकारी योजनेखाली मागासवर्गीय सोसायटीत मिळणारे घर ते आपले चुलते-आण्णा यांच्या नावावर घेतात. घर घेण्यासाठीही त्यांच्या काकीचे दागिने गहाण ठेवावे लागतात. आत्मकथनातील अशा वेगवेगळया प्रसंगांमधून त्यांचे कुटुंबाशी असणारे घट्ट बंध नजरेत येतात.

डॉ. मुणगेकर यांचे हे लेखन अनेक दृष्टींनी महत्त्वाचे ठरते. एकीकडे जे.पींच्या चळवळीविषयी बोलताना ते समाजवादी चळवळीचा इतिहास सांगतात तसेच समाजवादी धोरणांची चिकित्साही करतात. कॉंग्रेस हा

सर्वसमावेशक पक्ष असल्याने, समाजवादी मंडळींना त्यात राहून वेगळा गट म्हणून आपले अस्तित्व राखणे हे पटेलप्रभुतींना कसे मान्य नव्हते, याची चर्चा येते. नेहरूंची इच्छा होती की आतच राहून समाजवाद्यांनी जनमत आपल्या धोरणानुकूल बनवावे. परंतु समाजवादी १९४८मध्ये बाहेर पडतात. मुणगेकरांच्या मते असे बाहेर पडणे ही समाजवाद्यांची चूक होती. आणीबाणीनंतर स्थापन झालेल्या 'जनता पक्षा'त समाजवादी व जनसंघ आपापले पक्ष विसर्जित करून सामील झाले; पण ते एकत्र राहणे अशक्य होते व दोन-तीन वर्षांतच जनता पक्षाची शकले उडाली व समाजवादी पक्षाचीही वाताहत झाली; याबद्दलचे मुणगेकरांचे विश्लेषण परखड आहे व ते पटतेही त्यामुळे ते मुळातून वाचावयास हवे. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या लढाईत युक्रांदतर्फे ते मनापासून सहभागी झाले व या लढ्यात विसापूर येथे आठ दिवसांचा तुरुंगवासही त्यांनी भोगला. रिझर्व बँकेची नोकरी सोडल्याचा आनंद त्यांना या लढ्यात भाग घेता आल्यामुळे झाला.

डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'च्या महाविद्यालयांमधील अनेक अनुभव विषण्ण करणारे आहेत. कीर्ति कॉलेजमध्ये चार पगारवाढीसह मिळणारी नोकरी नाकारून बाबासाहेबांचे ऋण चुकवण्याच्या उद्देशाने वडाळ्याचे 'आंबेडकर कॉलेज' व फोर्टमधील 'सिद्धार्थ कॉलेज'; येथे दोन्हीत मनापासून काम करताना त्यांना सहकाऱ्यांकडून मानसिक त्रास होत राहतो. त्यास कंटाळून पुढील वाटचालीसाठी पीएचडी पूर्ण करणे, विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात रिक्त जागी अर्ज करणे व ८ मार्च १९८४ ला 'अर्थशास्त्र विभागा'त व्याख्याते म्हणून विद्यापीठात प्रवेश करणे; या घटना आयुष्याला वेगळे वळण प्राप्त करून देणाऱ्या ठरतात. याच काळात अनौपचारिकरित्या युक्रांद संपुष्टात आल्याने मात्र त्यांचे आंदोलित झालेले भावविश्व, पोकळी निर्माण झालेले मन प्रतिबिंबित होत राहते.

डॉ. मुणगेकर यांचे स्वतंत्रपणे सुरू झालेले सामाजिक कार्य, सहकारी पतपेढीची स्थापना व विद्यापीठीय स्तरावर आधी प्राध्यापक आणि नंतर कुलगुरू अशी एकापाठोपाठ सुरू झालेली घोडदौड, योजना आयोगाचे सदस्यत्व आणि वाढत्या जबाबदाऱ्या यांचा सलग पट *मी असा जगलो* हेच आरपार दाखवून देणारा आहे. १९८६ साली गरीब दलितांना मदत व्हावी म्हणून 'सहकारी पतपेढी'ची स्थापना, 'सिंधुदुर्ग जिल्हा विकास

मंडळा'ची स्थापना, विद्यापीठात 'डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ इकोनॉमिक चेंज' ची स्थापना यांमुळे त्यांच्या हातून विशेष कृतिशील कामे घडतात. विद्यापीठात त्यांचे दिवस त्यामानाने शांतपणे गेलेले वाटतात. त्यांच्या विचारसरणीमुळे प्राध्यापक ते प्यून या सर्वांशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होतात. १९९९ साली ते 'कृषिमूल्य आयोगा'चे सदस्य म्हणून दिल्लीला गेल्यामुळे त्यांना आवडणाऱ्या शिक्षकाच्या कामापासून त्यांची फारकत होते खरी पण आयुष्यात त्यांना जास्त महत्त्वाच्या भूमिका पार पाडता येतात. 'कृषिमूल्य आयोगा'त असतानाच कुलगुरू पदासाठी त्यांना विचारणा होते आणि २००० सालच्या मे महिन्यामध्ये मुणगेकर मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू होतात.

कुलगुरू म्हणून कार्यरत असतानाचे अनेक अनुभव त्यांनी नोंदवले आहेत. त्यातही आपल्या कार्यकाळात अनेकांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्या 'पेपरफुटी'सारख्या प्रकरणांना त्यांनी शांतपणे तोंड दिले आणि जबाबदार असणाऱ्या माणसांना पकडण्यातही ते कसे यशस्वी झाले, हे अनुभव वाचनीय आहेत. पदभार स्वीकारल्यानंतर आयोजित केलेल्या त्यांच्या सत्कारादिवशीच पु.ल.देशपांडे यांचे निधन झाल्याने आपण सत्कार स्वीकारू शकत नसल्याचे नम्रतेने सांगत त्यांनी त्याजागी शोकसभा घेतली. भावूक वृत्तीच्या मुणगेकरांचा येथे प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. याप्रसंगी त्यांनी इंग्रजीत पु.लं.च्या लिखाणावर अतिशय रसाळ विवेचन केले होते, या घटनेची प्रस्तुत लेखिका साक्षीदार आहे, पण हा उल्लेख पुस्तकात आलेला नाही. त्यांच्या स्वभावाची एक झलक म्हणून हे इथे लिहिले आहे. त्यांची व्हीसीपदाची मुदत संपण्याआधीच त्यांना योजना आयोगाचे सभासद म्हणून बोलावणे येते. हे आणखी मोठे क्षितिज, म्हणून विचारांती त्यांनी ते स्वीकारलेले असते. तिथे त्यांना कुटुंबासह राहता आले म्हणूनही अतिरिक्त आनंद होतो. योजना आयोगात असताना त्यांना सामाजिक न्याय, शिक्षण अशी त्यांना आवड असणारी सहा खाती मिळतात. तेथे मनापासून काम करता येते व या कामानिमित्त संपूर्ण देशात प्रवास घडतो. त्यांचे हे अनुभव मुळातूनच वाचणे आवश्यक आहे. या काळात त्यांनी अनुभवलेली एक घटना देशातील संकुचित विचारसरणी दाखवणारी आहे. मधु दंडवते एकदा योजना मंत्रालयात असताना मुणगेकर त्यांच्या भेटीस गेले. त्यांच्या दालनात त्यांनी नेहरूंचा फोटो हटवून सुभाषचंद्र बोस यांचा फोटो लावला

होता. कॉंग्रेस आल्यावर सुभाषबाबूंचा फोटो हटवून नेहरूंचा फोटो परत आला. मुणगेकरांना हे पटत नाही. त्यांचे म्हणणे असे होते की दोघांचाही फोटो त्या जागी हवा कारण १९३५ साली हरिपूर कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून सुभाषबाबू निवडून आले असता, त्यांनी 'आर्थिक नियोजन समिती' स्थापन केली. परंतु स्वत: कॉंग्रेसचे अध्यक्ष असल्याने, त्यांनी नेहरूंना त्या समितीचे अध्यक्ष बनवले. लेखकातील नि:पक्षवृत्तीच्या माणसाविषयी हा अनुभव खूप काही बोलणारा ठरतो.

आत्मकथनाच्या उत्तर भागात दिल्लीमधील जीवन, कामानिमित्त अनेक उच्च पदस्थांच्या भेटी, पंतप्रधानांच्या भेटी, वेगवेगळ्या प्रांतातील भटकंती असे वैविध्यपूर्ण अनुभव वाचावयास मिळतात. लेखकास आदरणीय असणाऱ्या के. एन. राज, अशोक मित्रा, ज्योती बसू इत्यादींच्या भेटीगाठी, त्यांच्यासोबत घडलेल्या चर्चा; हा त्यांच्या निखळ आनंदाचा भाग होता असे वाचताना जाणवते.

दिल्लीचे जीवन सकाळी अकरा वाजता सुरू होऊन संध्याकाळी लवकर संपत असे व रात्री पार्ट्यांना जाण्याची आवड नसल्याने, मुला-नातवंडांशिवाय घर रिकामे वाटत असे; ही त्यांची टिपणी दिल्लीचे वर्णन यथार्थ करते. मात्र संसदेची लायब्ररी खूप समृद्ध असल्याने आपल्या कार्यकाळात त्यांनी त्याचा भरपूर उपयोग केला, असेही ते नोंदवतात. राज्यसभेचे सदस्य असताना शैक्षणिक क्षेत्रात होऊ घातलेल्या बदलांमुळे अस्वस्थ झालेले मुणगेकर प्रत्ययास येतात. परदेशी विद्यापीठांना भारतात आमंत्रण देण्याबद्दल ते साशंक असतात. त्यांच्या मते, इंग्रजांपासून चालत आलेल्या शिक्षणपद्धतीला आपण जसेच्या तसे स्वीकारले. इंग्रजांची गरज वेगळी होती व स्वतंत्र देशाची गरज वेगळी आहे. रोजगाराभिमुख, नव्या काळाशी सुसंगत अशी पद्धत जोवर आपण स्वीकारत नाही तोवर परदेशी विद्यापीठांना इथे बोलावण्यात अर्थ नाही. शिक्षणक्षेत्रातला कुणीही त्यांच्याशी सहमत होईल. दिल्लीमधील एक निरीक्षण अतिशय बोलके आहे आणि लेखकाच्या अपेक्षेचे दर्शन घडवणारेही आहे. दिल्लीत आपल्या पक्षापलीकडे जाऊन राज्याच्या भल्यासाठी झटणारी, अनेक राज्यांची लॉबी दिल्लीत आढळते. महाराष्ट्राची अशी लॉबी यशवंतरावांपासून आजतागायत निर्माण झालेली आढळत नाही, याची खंत त्यांना वाटत राहते.

संग्राहित

डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे हे आत्मकथन कोकणातील ग्रामीण वास्तव, ते बदलण्यासाठी लेखकाचे प्रयत्न इथपासून ते दिल्लीमध्ये २०१६ पर्यंतच्या काळात हातून घडलेले भरीव काम, अशा एका व्यापक अनुभवविश्वाला कवेत घेणारे आहे. कुटुंबाप्रती वत्सल असणाऱ्या मुणगेकरांनी खडतर प्रयत्नांद्वारे स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडवले आहे. आंबेडकरी विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ म्हणून राष्ट्रीय स्तरावर आपली मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचे हे अनेकविध पैलू उलगडवून दाखवणारे आत्मकथन म्हणून आवर्जून वाचलेच पाहिजे.

संशोधन


# 'नाथपंथी डवरी गोसावी' या वंचित जातीच्या इतिहासाचा अस्सल दस्तऐवज : *देशोधडी...*


**प्रदीप मोहिते**

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर.

pradeepmohite555@gmail.com




**(परीक्षित पुस्तक: *देशोधडी आडं, मेडी, बारा खुट्याची*, लेखक: नारायण भोसले, प्रकाशक: मनोविकास प्रकाशन, पुणे, प्रकाशन वर्ष: २०२१, पृ. ३०८, मूल्य: रु. ३५०)**

मनोविकास प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेले नारायण भोसलेलिखित *देशोधडी आडं, मेडी, बारा खुट्याची* हे आत्मकथन म्हणजे आशय आणि अभिव्यक्ती यांच्यादृष्टीने सकस आणि सौष्ठवपूर्ण अशी साहित्यकृती आहे. ही कथा आहे 'नाथपंथी डवरी गोसावी' या भटक्या जातीत जन्माला आलेल्या नारायण भोसले यांची व त्यांच्या जातीच्या वाट्याला आलेल्या 'सर्वंकष यातनामय भटकंतीची.'

प्रस्तुत आत्मकथनामध्ये डॉ. नारायण भोसले यांचे प्राध्यापक होईपर्यंतचे कथन येते. शिक्षणासाठी त्यांनी केलेली प्रयत्नांची शिकस्त, त्यांच्या कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसांनी उपसलेले कष्ट आणि अभावग्रस्त परिस्थितीशी केलेला संघर्ष हा मती कुंठित करणारा आहे. लेखक नारायण भोसले यांचे 'इतिहास' या विषयाचा प्राध्यापक असणे; ते स्वतः 'फुले-

संभाषित

आंबेडकरी चळवळी’शी संबंधित असणे; ही या आत्मकथनाची सर्वाधिक जमेची बाजू आहे. त्यांच्या ठायी असलेली अंगभूत बुद्धिमत्ता आणि परिवर्तनवादी चळवळीने त्यांच्यावर केलेले पुरोगामित्वाचे संस्कार यांची वाङ्मयीन आणि सामाजिक फलश्रुती म्हणजे हे आत्मकथन होय.

या साहित्यकृतीस नाथपंथी डवरी गोसावी या वंचित जातीचा ‘ऐतिहासिक दस्तऐवज’ म्हणता येईल कारण या जातीचा इतिहास आजवर लिहिला गेलेला नाही. भोसले यांनी त्यांचे आई, वडील आणि वयोवृद्ध आप्तेष्ट यांच्याशी चर्चा करून पिढ्यानपिढ्या मौखिक परंपरेने जतन करून ठेवलेल्या आपल्या वाडवडिलांच्या आठवणी, पोटासाठी भटकंती करताना आलेले कडूगोड अनुभव, समर घटना-प्रसंग यांचे संकलन केले असून या सर्व संकलित घटितांचे ऐतिहासिक दृष्टीने विश्लेषण करत त्यांची सुसंगत व तटस्थ वृत्तीने मांडणी केली आहे. यासंदर्भात सदर आत्मकथनाची अर्पणपत्रिका पुरेशी बोलकी आहे. “अर्पण हे अक्षर भटक्या बिराड जीवनाला ज्यांनी इतिहास आठवणीत जतन केला अन् जमेल तसा सांगितला.”

नाथपंथी डवरी गोसावी या उपेक्षित भटक्या जातीचा इतिहास किती यातनामय, संघर्षमय, तरीसुद्धा किती प्रकाशसन्मुख असू शकतो, हे या आत्मकथनाच्या माध्यमातून प्रत्ययास येते. प्रकाशसन्मुख म्हणण्याचे कारण असे की डॉ. नारायण भोसले आणि त्यांची सर्व भावंडे या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आज उच्चविद्याविभूषित आणि उच्च पदांवर कार्यरत आहेत.

समाजमनाची सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय बधिरता देशाच्या निरामय विकासाच्या कशी आड येते, हे *देशोधडी*च्या निमित्ताने प्रकर्षाने जाणवते. लेखकाने पाहिलेला ‘भारत देश’ हा भुकेकंगाल जनसमूहाच्या जगण्याच्या धडपडीने व्यापलेला भारत देश आहे. त्यांचे जगणे जितके यातनामय आहे तितकेच त्यांचे मरणेदेखील यातनामय आहे. पुस्तकातील ‘आजोबांच्या मरण्याचा थरार’(पृ ३०-३७ ) हे प्रकरण वाचल्यानंतर सदर वाक्याची यथार्थता पटू शकते. देव आणि धर्माच्या नावाखाली देशोधडीला लागलेले हे लोक रिकाम्या झोळीने, रिकाम्या खिशाने आणि रिकाम्या पोटाने भीक मागत मागत फिरतात. कधी रेल्वेने, कधी चालत तर कधी जनावरांवर बसून हे भटकणं पिढ्यानपिढ्या चालूच आहे. भारताच्या शेजारचे नेपाळसारखे

देश, दिल्ली, कलकत्ता, कराची अशा कितीतरी स्थळांचा उल्लेख या आत्मकथनामध्ये पाहावयास मिळतो. 'मुरादाबादचा रस्ता' (पृ. १६०) या प्रकरणामधील 'मीराच्या जन्माची हकिकत' वाचल्यावर या समाजाचे समग्र भारत देशाशी असलेले नाते किती परात्म आहे, हे अनुभवास येते. अर्थात ही परात्मता या भटक्या समाजाच्या मनातून निर्माण झालेली नसून या देशातील जात, वर्ग, धर्म, लिंग यावर आधारित असलेल्या विषमतावादी व्यवस्थेतून निर्माण झालेली आहे. या समूहाच्या नजरेतील माणसं, त्यांच्या देशाविषयीच्या कल्पना, त्यांचे राष्ट्र आणि राष्ट्रवाद, ते साद घालत असलेला मानवाधिकार हा आपल्या समाजशास्त्र, इतिहास, भूगोल आदी क्रमिक पुस्तकांमधील समाजचित्रणापेक्षा वेगळा आहे. या संदर्भात 'माझा कलकत्ता प्रवास'(पृ. २५५) हे प्रकरण अधिक बोलके आहे. त्यांनी पाहिलेला आणि या आत्मकथनात शब्दबद्ध झालेला देश म्हणजे भारताचे अंधारातले राजकीय चरित्र आहे. या मुद्याच्या पृष्ट्यर्थ 'मुरादाबादचा रस्ता' (पृ. १६०), 'जंगली श्वापदांच्या माऱ्यात मीरा', 'आईच्या पायात रूतलेला काटा' (पृ.१८०) या प्रकरणांमधील अनेक पेचप्रसंग पाहता येतील. या प्रत्येक वेळी नारायण भोसले यांच्या कुटुंबातील लोक एकाकीपणे झुंजताना दिसतात. त्यांच्या कोणीही मदतीला येत नाही. देशातील अनेक राज्यांमधील त्यांनी शब्दबद्ध केलेले कसोटीचे क्षण आणि त्या-त्या प्रसंगी अलिप्तच राहणारा भारतीय समाज ही विदारक वस्तुस्थिती आहे. नारायण भोसले यांच्या तीन पिढ्यांनी बघितलेला भारत कोणकोणत्या अर्थाने वेगळा आहे, हे या आत्मकथनाच्या वाचनाने समजून घेता येते.

आज भाषांच्या अस्तित्वाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. त्यामुळे प्रस्तुत आत्मकथनामध्ये डॉ. भोसले यांनी नाथपंथीय डवरी गोसावी जातीच्या; स्वत:च्या बोलीविषयी विस्तृतपणे लिहिणे अपेक्षित होते. मात्र तसे एखादे खास प्रकरण प्रस्तुत आत्मकथनात पाहावयास मिळत नाही.

ज्या जीवनाची कल्पनाही करता येत नाही असे जीवन जगणारा एक जात-जमातसमूह सभोवती असूनही त्याबाबत पूर्णतः अलिप्त आणि अनभिज्ञ असणाऱ्या तथाकथित उच्चशिक्षित, उच्च अभिरुचिसंपन्न आणि उच्च जात-वर्गीय समाजबांधवांना खडबडून जागे करण्याची ताकद असलेले हे आत्मकथन म्हणूनच आवर्जून वाचावे, अशा स्वरूपाचे आहे.

नारायण भोसले यांचे हे आत्मकथन नाथपंथी डवरी गोसावी जातीच्या वाट्याला आलेल्या; 'अन्नासाठी दाही-दिशांच्या भटकंतीचा प्रश्न' फार तीव्रपणे मांडताना दिसते. म्हणून हे आत्मकथन; जात-वर्ग-धर्म-लिंग यांवर आधारित अमानुष विषमता जोपासणाऱ्या व्यवस्थेला जोरदार हादरा देणारे आहे. नारायण भोसले वाचकांशी जो संवाद साधतात त्या संवादाला एका गहनगंभीर अशा काव्यात्म शैलीचे अवगुंठन लाभले आहे. प्रस्तुत आत्मकथनाशी वाचक तादात्म्य पावतील, असे शब्दबंध आणि वाक्यबंध तसेच भावनेचा ताबा घेणारी व्यक्तिचित्रणे आणि प्रसंगचित्रणे प्रत्येक पानावर पाहवयास मिळतात.

सामाजिक व्यवस्थेत प्रस्थापित आयुष्य जगणाऱ्यांच्या वाट्याला कधीही न येणाऱ्या बाबी या आत्मकथनातील व्यक्तींच्या वाट्याला आलेल्या आहेत. गाव बामणी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथून सुरू होणारा त्यांचा प्रवास भारतभरातील विविध खेड्यांमध्ये होतो. तेथील माणसे, रस्ते, छोट्या वाटा, नद्या, डोंगर, जंगले, हिंस्त्र श्वापदे, डाकू, चोर, मवाली यांचे अनुभव मुळातून वाचावे, असेच आहेत. अर्थात नारायण भोसलेंचा व त्यांच्या जमातीचा जीवनप्रवास, या जीवनप्रवासातील व्यामिश्रता व त्यांच्या व्यथा आणि इथल्या व्यवस्थेत खोल आणि घट्ट रुतलेली वेदनांची पाळेमुळे; या सर्वांची चिकित्सा करण्यासाठी हा लेखक आपल्या कसदार लेखणीने सदर आत्मकथन तीन खंडांमध्ये सादर करणार आहे, पैकी *देशोधडी...* हा प्रथम खंड असून *अनाथपंथी* हा दुसरा आणि *भटकत मरो मत कोय* हा तिसरा खंडही प्रकाशनाच्या मार्गावर आहे. वाचक या त्रिखंडात्मक आत्मकथनाचे नक्की स्वागत करतील. ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मण गायकवाड यांनी या आत्मकथनाविषयी रास्त लिहिले आहे, 'भटक्या विमुक्तातील सामाजिक भान असलेले प्रा. डॉ. नारायण भोसले यांचे 'देशोधडी' हे आत्मकथन नव्याने येत आहे...मी असे भाकीत करतो, की त्यांचे 'देशोधडी' हे आत्मकथन विमुक्त भटक्यांमध्ये नवीन खळबळ उडवून देणारे ठरेल. विचारशील, चिंतनशील अशा स्वरूपाच्या मराठीतील या आत्मकथनाचे मोठ्या प्रमाणात लोक स्वागत करतील, अशी मला आशा आहे. नारायण भोसले यांनी 'देशोधडी' या आत्मकथनात अत्यंत दुःख आणि वेदनांनी भरलेल्या आपल्या आईवडिलांचे जीवन आणि कुटुंबीयांचे शोषण, त्यांची परिस्थिती


या सर्व गोष्टी आणलेल्या आहेत. मराठीत साहित्यिक म्हणून त्यांचे मोठ्या प्रमाणात स्वागत होईल...'(ब्लर्ब). डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घडवलेल्या धम्मक्रांतीने अस्पृश्य महारादींच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात उत्थान घडून आले त्या पार्श्वभूमीवर भटक्या समूहाच्या विदारक जगण्याचे चित्रण आलेल्या या आत्मकथनात देव आणि धर्म यांची चिकित्सा किंवा नाथपंथी डवरी गोसावी यांच्या संदर्भातील सामाजिक-सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितीविषयीची चिकित्सा यायला हवी होती, असे जाणवत राहते. पुढील खंडांमध्ये या उणिवा दूर होतील, ही अपेक्षा आहे. मात्र तरीही आहे या स्वरूपात *देशोधडी* हे आत्मकथन निश्चितच वाचनीय आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे, यात शंका नाही.

संभाषित

# जॉर्ज ऑर्वेल यांच्या निवडक निबंधांचा अनुवाद

**दीपक बोरगावे**

इंग्रजी विषयाचे निवृत्त प्राध्यापक, अनुवादक व समीक्षक
deepak.borgave7@gmail.com




**(परीक्षित पुस्तक : *जॉर्ज ऑर्वेल : निवडक निबंध आणि लेख (अनुवाद आणि भाष्य)* लेखक आणि अनुवादक : मनोज पाथरकर, मनोविकास प्रकाशन, पुणे, प्रकाशन वर्ष : २०२२, एकूण पृष्ठे : २६३, मूल्य: रु. २९९/-)**

जॉर्ज ऑर्वेल (मूळ नाव, एरिक ब्लेअर, १९०३-१९५०) हे विसाव्या शतकातील केवळ एक युरोपीय परखड विचारवंतच नव्हते, तर जागतिक राजकारणावर महत्त्वाची निरीक्षणे नोंदवणारे ते भाष्यकार होते. ऑर्वेल हे मार्क्सवादी होते. कम्युनिस्ट चळवळीमध्ये त्यांचा सहभाग होता. पण त्याचबरोबर ते मार्क्सवादी नव्हतेही. स्पेनच्या यादवी युद्धात त्यांचा सहभाग राहिला. *होमेज टू कॅटालोनिया* (१९३८) या पुस्तकाचा जन्म या युद्धात होरपळून निघालेल्या भयंकर अनुभवाचा हा दस्तऐवज आहे. रशियामधील स्टॅलिन यांच्या पठडीबंद कार्यपद्धतीमुळे ऑर्वेल यांनी कम्युनिझमला कायमचा रामराम ठोकला. सुरुवातीला इंग्लंडमधल्या ‘लेफ्ट बुक क्लब’ च्या माध्यमातून डाव्या चळवळीकडे ओढले गेलेले ऑर्वेल यांच्या डोक्यातून मार्क्सवादी विचार मात्र कधीच पुसट झाला

नाही. एका वेगळ्या अर्थाने डाव्या विचाराचा प्रभाव हा त्यांच्या लेखनावर कायम उमटलेला दिसतो. लोकशाही समाजवादाची कास धरणारे आणि श्रमिक आणि गरीब समाजासाठी झटणारे विचारवंत आणि पत्रकार म्हणून त्यांची प्रतिमा कायम राहिली. हीच वैचारिक भूमिका घेऊन 'ट्रायब्यून' या इंग्लंडमधील अत्यंत प्रभावी नियतकालिकात ऑर्वेल यांनी सातत्याने लेखन केले आहे. अगदी वेगळ्या धाटणीचे पत्रकार, निबंधकार आणि बीबीसी या जागतिक रेडिओ संस्थेवर सातत्याने काही ना काही जागतिक घटनांबद्दल आणि राजकारणाबद्दल कॉमेंट्री करणारे विश्लेषक तज्ज्ञ म्हणून त्यांनी दिलेले योगदान आजही विस्मरणाच्या गर्तेत गेलेले नाही, ही फार महत्त्वाची गोष्ट वाटते.

कादंबरीकार म्हणून जॉर्ज ऑर्वेल यांचे स्थान अत्यंत प्रसिद्ध आणि लोकप्रिय जरी असले तरी, ते विसाव्या शतकातील एक दुय्यम कादंबरीकार म्हणून गणले गेले. *ॲनिमल फॉर्म* (१९४५) आणि *नाईंटीन एटीफोर* (१९४९) या त्यांच्या दोन कादंबऱ्यांमुळे त्यांचे नाव विसाव्या शतकात सतत गाजत राहिले. त्यांना नोबेल पारितोषिक दिले गेले पाहिजे, इथपर्यंत अनेकांनी चर्चा केलेली दिसते. सर्व प्राणी समान आहेत पण काही प्राणी इतरांपेक्षा अधिक समान आहेत (All animals are equal but some animals are more equal than others); दोन्ही बाजूंनी बोलणे/ कोणतीच भूमिका न घेणे (Doublespeak); युद्ध म्हणजेच शांतता (War is Peace); स्वातंत्र्य म्हणजे गुलामगिरी (Freedom is Slavery); अज्ञान हीच शक्ती आहे (Ignorance is Strength); जो भूतकाळाला काबूत ठेवू शकतो, तो भविष्याचे नियंत्रण करतो; जो वर्तमानाला काबूत ठेवू शकतो, तो भूतकाळाचे नियंत्रण करतो (Who controls the past controls the future, who controls the present controls the past) वगैरे परत-परत उद्धृत केली जाणारी वाक्ये आणि शब्दप्रयोग खास ऑर्वेलियन म्हणून जगभर प्रचलित झाली आहेत. आजही या शब्दांचा प्रयोग अनेक ठिकाणी वेगवेगळ्या निमित्ताने होत असतो. ही वाक्ये आणि हे शब्दप्रयोग त्यांच्या या गाजलेल्या दोन प्रसिद्ध कादंबऱ्यांमधील आहेत.

जॉर्ज ऑर्वेल यांच्या *ॲनिमल फॉर्म* आणि *नाईंटीन एटीफोर* या दोन कादंबऱ्या जगातील अनेक भाषांमध्ये अनुवादित झाल्या आहेत. मराठीमध्ये देखील त्या अनुवादित रूपात प्रसिद्ध आहेत. याचा उल्लेख आणि चर्चा नेहमी होत असते. *ऑर्वेलिया* (वर्णमुद्रा प्रकाशन, २०२१) या

शीर्षकाचे एक पुस्तक अलीकडेच मराठीत प्रसिद्ध झाले आहे. त्याचबरोबर मराठीत ज्याला समीक्षा म्हणता येईल अशा प्रकारचे चिकित्सक लेखन देखील या दोन कादंबऱ्यांवर वेळोवेळी झाले आहे. पण ऑर्वेल यांचे निबंध, त्यांची पत्रकारिता, आपल्या तत्कालीन समाजावर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि सर्वांगाने केलेले भाष्य, जे त्यांच्या निबंधांमध्ये प्रामुख्याने प्रतिबिंबित झाले आहे, त्याबद्दल मात्र (काही निबंधांचे आणि विशेषतः ऑर्वेल यांचे भाषेवरील असलेले लेखन सोडून) मराठीत फारसे लिहिले गेले नाही; त्यावर काही भाष्य केले गेलेले नाही. या अंगाने फारशी समीक्षा उपलब्ध नाही. मनोज पाथरकर यांच्या या अनुवादित पुस्तकाने ही गरज भरून काढली आहे असे म्हणावे लागेल.

एक पत्रकार, निबंधकार आणि राजकीय विश्लेषक म्हणून ऑर्वेल यांचे स्थान आज एकविसाव्या शतकातही अबाधित आहे, यात कोणतीच शंका नाही. विसाव्या शतकातील विशेषतः १९३६ ते १९५० या अडीच दशकात त्यांनी केलेले वृत्तपत्रीय लेखन आजच्या पत्रकारितेसमोर आदर्श ठरावे असेच आहे. *George Orwell: Essays* (George Orwell: Essays, London: Penguin Books in association with Martin Secker & Warburg First Print 1968; 2000) या पुस्तकात त्यांचे ४१ निबंध संग्रहित केले आहेत. हा एक प्रातिनिधिक निबंधसंग्रह आहे. एक पत्रकार, विचारवंत, तत्कालीन परिस्थितीत प्रागतिक परिवर्तन घडावे म्हणून धडपणारा लेखक याचे प्रतिबिंब यात पडले आहे. यातील विषयांची वैविध्यता आणि तपशिलांच्या नोंदी पाहिल्यास हा लेखक आपल्या काळाच्या खूप पुढे जाऊन विचार करणारा होता, हे सहज लक्षात येते. Why I Write?; Inside the Whale; Charles Dickens; Rudyard Kipling; W. B. Yeats; Poetry and the Microphone; My Country Right or Left?; Arthur Koestler; In Defence of P. G. Woodhouse; Notes on Nationalism; Nonsense Poetry; Books versus Cigarettes; Politics and the English Language; How the Poor Die?; Lear, Tolstoy and the Fool; Reflections on Gandhi; Such, Such Were the Joys; Writers and Leviathan वगैरे निबंध काही वानगीदाखल देत आहे. मनोज पाथरकर यांनी यातील आणि इतरत्र स्त्रोतातून निवडक निबंधांचा अनुवाद केला आहे. त्याचे नीट असे वर्गीकरण केले आहे. त्यामुळे वाचक कोणताही

एक निबंध निवडून आपल्या रूचीप्रमाणे वाचू शकतो, ज्याला आपण आज इंग्रजीमध्ये reader friendly म्हणतो, तसे हे आहे. कोणताही एक निबंध काढून आपण वाचतो आणि तो निबंध सहजतेने आपल्या आजच्या समकालीन परिस्थितीशी जोडला जातो. ही गोष्ट या अनुवादाबाबत विलक्षण अशीच म्हणावी लागेल. पाथरकर यांनी या पुस्तकात ऑर्वेल यांचे एकूण पंचवीस निबंध अनुवादित केले आहेत. त्यांनी हे निबंध सात विभागात एकत्रित केले आहे. या विभागांची शीर्षके पाहिल्यानंतर (लेखन, साहित्य, प्रचार; हुकूमशाही आणि साहित्य; आंतरराष्ट्रीय राजकारण; विवेकाधारित मानवतावादी विचारपद्धती; लेखक आणि त्याचे साहित्य; ललित; आणि पुन: पुन्हा ऑर्वेल) आपणाला काय ताबडतोबीने वाचायचे आहे आणि गंभीर स्वरूपाचे लेखन हे नंतर शांतपणाने वाचायचे आहे, याचा अंदाज येऊन जातो.

या पुस्तकातील प्रत्येक अनुवादित लेखात तीन विभाग आहेत. ही रचना मला स्वतःला खूप आवडली. पहिल्या भागात लेखाबद्दलची प्रस्तावना आहे. दुसरा भाग प्रत्यक्ष लेखाचा अनुवाद आहे आणि शेवटच्या भागामध्ये अनुवादकाने स्वतःचा या लेखाबद्दलचा 'समारोप' केला आहे. म्हणजे अनुवादित केलेल्या लेखाचा नेमका अन्वय काय? आपल्या आजच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक भवतालाशी याचा काही संबंध असावा किंवा नसावा? असेल तर तो नेमका काय आहे? याचे समर्पक विवेचन येते. इथे अनुवादकाचे महत्त्वाचे असे भाष्य आले आहे.

एकच उदाहरण घेऊया; Why I Write? (1946) मी का लिहितो?

यातील पहिला भाग 'परिचय' असा आहे. हा लेख कोणत्या निमित्ताने लिहिला गेला? कधी लिहिला गेला? या पाठीमागची कारणमीमांसा काय वगैरे गोष्टींचा उल्लेख या पहिल्या भागात आला आहे. एका नियतकालिकासाठी लिहिलेला हा लेख असा उल्लेख यात आहे. हा लेख वस्तुतः England Your England Essays: Journalism यात संग्रहित झालेला आहे (पृ. ६). याचा उल्लेख इथे आलेला नाही. पण त्यामुळे काही बिघडत नाही.

"मी का लिहितो?" यात ऑर्वेल यांनी लेखन करण्याविषयीचे काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. मी का लिहितो? हे सांगत असताना लोक का लिहित असतात? लेखक का लिहितो? लेखन करण्यापाठीमागच्या प्रेरणा कोणत्या असतात? कशासाठी लिहायचे? असे

हे प्रश्न आहेत. मुळात एक पत्रकार म्हणून लेखन करत असताना ऑर्वेल यांच्या जीवनदृष्टीची संवेदना ही प्रामुख्याने राजकीय होती. १९३०/४० या कालखंडातली आर्थिक मंदीची लाट, हिटलरचा उदय, स्पॅनिश यादवी युद्ध, दुसऱ्या महायुद्धाचा भडका अशा भयंकर वातावरणात या दरम्यान लेखकांची जी पिढी निर्माण झाली ती सगळीच्या सगळी राजकीय संवेदना घेऊन लिहिणारी होती (ख्रिस्तोफर कॉडवेल, डब्ल्यू. एच. ऑडन, स्टीफन स्पेंडर वगैरे. ही यादी मोठी होऊ शकते). यात काही आश्चर्य वाटण्यासारखे नाही, कारण ती त्या काळाचे अपत्य होती. बरेच लेखक, विचारवंत आणि प्रत्यक्ष रणांगणात कार्यरत असलेले कार्यकर्ते या सर्व दहशतीच्या वातावरणाला घाबरून पळूनही गेले होते, तीदेखील त्यांची राजकीय कृतीच होती. अर्थात, याबद्दलचा तपशील ऑर्वेल यांच्या या लेखात आलेला नाही. पण त्यांनी आपल्या एका महत्त्वाच्या पुस्तकाचा उल्लेख (Homage to Catalonia) या लेखात केला आहे त्यावरून याची प्रचिती येते. फॅसिझम, हुकूमशाही, एकाधिकारशाहीच्या विरुद्ध लढणे आणि लोकशाहीवादी समाजवादाचा पुरस्कार करणे ही ऑर्वेल यांच्या लेखनाची मुख्य प्रेरणा होती. पण सर्जक लेखनात सौंदर्यवादी आणि बौद्धिकदृष्टी ही अत्यंत महत्त्वाची असते असे मानणारा हा लेखक लेखनाच्या एकूण चार प्रेरणांबद्दल बोलतो : १. अहंभाव, शहाणपणाचे प्रदर्शन, स्वार्थ, ज्यांनी आपणाला कधीकाळी (बहुतेककरून, आपल्या बालपणी) कमी लेखले होते किंवा आपणाला काही येत नाही, समजत नाही म्हणून त्यांच्याशी सहमत होण्याची परिस्थिती (बहुतेक सक्तीच) निर्माण केली गेली होती... अशा लोकांना काही सांगण्याची संधी लेखनातून मिळते, असे ते म्हणतात. पत्रकारितेचे लेखन करणाऱ्या लेखकांपेक्षा काही थोर प्रतिभावंत आणि गंभीर स्वरूपाचेही लेखन करणारे (जरी त्यांना पैसे मिळवण्यात रस नसला तरीही) हे लेखक सारांशाने स्वतःमध्ये अधिक रमणारे आणि स्वकेंद्री असतात. २. बाह्य जगातील सौंदर्याचे आकलन करूनच कोणत्याही चांगल्या पुस्तकाची निर्मिती होत असते. अशा प्रकारची सौंदर्यात्मक दृष्टी असणारे खूप कमी लेखक असतात. कोणत्याही चांगल्या पुस्तकाच्या निर्मितीत हे सौंदर्यात्मक मूल्य असावेच लागते. ३. इतिहासाबद्दल सत्य जाणून घेण्याची उर्मी. ४. आणि शेवटी, राजकीय हेतू. इथे राजकीय हेतू म्हणजे केवळ एक विशिष्ट राजकीय विचार, प्रत्यक्ष सुरू असणारे संसदीय राजकारण, पार्टी पॉलिटिक्स, निवडणूका, प्रचार किंवा पक्षाचे राजकारण... वगैरे. अशा

मर्यादित अर्थाने ऑर्वेल यांनी राजकारण ही संकल्पना वापरलेली नाही. व्यापक अर्थाने इथे कलेचा विचार केला आहे. धर्म, राजकारण, विविध सामाजिक संस्था, विचारप्रणाली यांचा लेखनाशी जवळचा संबंध असतो. अशा अर्थाने ऑर्वेल यांचे हे निरीक्षण आपणाला समजावून घेतले पाहिजे. कुठल्याही प्रकारचे लेखन, पुस्तक किंवा ग्रंथ हे राजकीय भूमिका (मग ती भूमिका कोणतीही असो... डावी-उजवी किंवा अर्धी-डावी अर्धी-उजवी [याचा अर्थ संधीसाधू भूमिका] किंवा कोणत्याही भूमिकेची संपूर्णतः अनुपस्थिती) असल्याशिवाय लिहिले जाऊच शकत नाही, असे ऑर्वेल यांचे गृहीतक यामागे आहे. कलेचा आणि राजकारणाचा काहीच संबंध नाही असे काही कलावादी मंडळी, समीक्षक, विचारवंत नेहमी सांगत असतात. ही देखील त्यांची एक राजकीय भूमिकाच आहे असे ऑर्वेल यांचे म्हणणे आहे. ऑर्वेल यांनी या लेखामध्ये जी निरीक्षणे नोंदवली आहेत, त्या अनुषंगाने इथे काही प्रतिपादन केले आहे.

मनोज पाथरकर यांनी या लेखाचा उत्तम अनुवाद केला आहे (पृ. २१-२९). या लेखाचा नेमका गाभा पकडण्यात ते यशस्वी झाले आहेत. या लेखातील बऱ्याच अनावश्यक अशा गोष्टी (यामध्ये ऑर्वेल यांनी आपल्या किशोरवयीन वयात लिहिलेली कविता सुद्धा आहे) त्यांनी अनुवादित करण्याचे टाळले आहे; हे फार महत्त्वाचे आहे. अनुवादक अनुवाद कशासाठी करतो? असा एक प्रश्न नेहमी अनुवाद अभ्यासामध्ये विचारला जातो. हे सर्व अनुवादित लेख पाथरकर यांनी एका मोठ्या ऑडियन्सला (दैनिक लोकसत्तामध्ये लिहिलेली ही अनुवाद लेखमाला आहे) संबोधित केलेले आहे. या लेखातील तत्कालिन गैरलागू संदर्भ म्हणूनच त्यांनी टाळलेले आहेत (अशा संहिता अनुवादित करताना एक चांगला अनुवादक अशा प्रकारची काळजी घेत असतो). यामुळे या अनुवादित लेखाला (आणि पर्यायाने या पुस्तकातील सर्वच अनुवादित लेखांना) एक प्रकारची एकसंघता आणि आकलनाच्या दृष्टिकोनातून एक व्यापकता प्राप्त झाली आहे. ही या अनुवादाची जमेची बाजू म्हणावी लागेल. याचा विचार करता मनोज पाथरकर हे अभिनंदनास पात्र झाले आहेत.

याच लेखातील (Why I Write?) 'समारोपात' पाथरकर यांनी IRD चा (Information Research Department) उल्लेख केला आहे. यासंदर्भात तंत्र आणि लोकशाहीच्या अनुषंगाने जे निरीक्षण त्यांनी नोंदवलेले आहे त्याबद्दल काही सांगणे गरजेचे आहे. ऑर्वेल यांनी आपले

संपूर्ण आयुष्य आणि लेखनप्रपंच लोकशाही समाजवादासाठी खर्च केले. याबद्दल एक कणही शंका कोणालाही येण्याची शक्यता नाही. रशियातील साम्यवादाच्या भ्रमनिरासानंतर स्टालिनच्या एकाधिकारशाहीच्या विरोधात ऑर्वेल यांनी लेखन केले (*ॲनिमल फार्म* ही कादंबरी त्याचे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल) असे असले तरीही, ऑर्वेल हे ट्रॉट्स्कीवादी राहिले. ते रशियातील एकाधिकारशाहीच्या विरुद्ध होते; स्टॅलिनच्या कार्यपद्धतीच्या विरुद्ध होते. पण त्यांनी लोकशाहीविरोधी भूमिका कधीच घेतली नाही, हे या ठिकाणी मुद्दामहून नमूद करावे असे वाटते.

आजचा राजकीय माहोल पाहता जॉर्ज ऑर्वेल यांची पत्रकारिता, त्यांचे गद्यलेखन आणि विशेषतः आपल्या जाणिवांना प्रखरतेने जागृत करणारे त्यांचे वैचारिक लेखन यांचा अन्वय आज अधिक महत्त्वाचा आहे. या अर्थाने त्यांच्या लेखनाला एक सार्वत्रिक मूल्य प्राप्त झाले आहे. या अनुषंगाने ऑर्वेल यांच्या गद्य लेखनाचा अनुवाद मराठीत झाला, ही एक अभूतपूर्व घटना आहे, असेच म्हणावे लागेल.

मनोज पाथरकर यांनी जॉर्ज ऑर्वेल यांच्या इतरही निबंधांचा अशाच प्रकारचा अनुवाद करावा असे या पुस्तकाच्या निमित्ताने सुचवावे असे वाटते. कारण ही आजची एक नितांत गरज झाली आहे.

# लेखक परिचय

संक्षिप्त

**वर्षा शिरीष फाटक**

वर्षा शिरीष फाटक या देवरूखच्या आठल्ये-सप्रे-पित्रे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारप्राप्त स्वायत्त महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत असून गेली वीस वर्षे अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांनी ‘डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या ललित साहित्याचा चिकित्सक अभ्यास’ या विषयावर मुंबई विद्यापीठातून विद्यावाचस्पती ही पदवी प्राप्त केली असून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय चर्चासत्रांमध्ये अनेक शोधनिबंध सादर केले आहेत. विविध वृत्तपत्रे, वाङ्मयीन नियतकालिके आणि विविध ग्रंथांमध्ये त्यांनी लेखन केले आहे. तसेच विद्यापीठअनुदान आयोग व मुंबई विद्यापीठाचे लघुसंशोधन प्रकल्प केले आहेत. स्वामी विवेकानंद योग अनुसंधान केंद्रातून त्यांनी योगशिक्षक म्हणून प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण करून योगशिक्षक व विद्यावाचस्पती (पीएच.डी.) मार्गदर्शक म्हणूनही कार्यरत आहेत.

**अविनाश कोल्हे**

अविनाश कोल्हे हे राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आणि सर्जनशील लेखक आहेत. गेली अनेक वर्षे ते ‘राष्ट्रीय राजकारण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण’ यावर मराठी आणि इंग्रजीत साप्ताहिक सदर लिहित आहेत. यांनी साल्सबर्ग ऑस्ट्रिया, अमेरिका आणि इराण या देशांचा अभ्यासदौरा केला आहे. गेली तीस वर्षे अमराठी रंगभूमीवर मंचित होत असलेल्या नाटकांची परीक्षणं करत असून यातील त्यांच्या निवडक परीक्षणांचा संग्रह रंगदेवतेचे आंग्लरूप: मुंबईतील अमराठी रंगभूमी या नावाने लोकवाङ्मय गृह प्रकाशनातर्फे २०१६ साली प्रसिद्ध झाला. अविनाश कोल्हे यांचा सेकंड इंनिग हा राज्यशासन पुरस्कारप्राप्त कथासंग्रह २०१७ साली प्रकाशित झाला असून २०१८ साली चौकट वाटोळी ही त्यांची कादंबरी प्रकाशित झाली आहे. या कादंबरीस वर्धा येथील प्रतिष्ठित ‘दाते पुरस्कार’ मिळाला आहे. ही दोन्ही पुस्तके ई-बुक स्वरूपात उपलब्ध आहे. २०१८ साली ‘मॅजेस्टिक प्रकाशन’मुंबईतर्फे आयोजित हिंदू कादंबरी लेखनस्पर्धेत अविनाश कोल्हे यांच्या पंगतीतलं पान या कादंबरीला पहिला आणि एकमेव पुरस्कार मिळाला. ही कादंबरी ‘मॅजेस्टिक प्रकाशना’तर्फे २०२० साली प्रकाशित झाली असून तिला ‘विदर्भ साहित्य संघ, नागपूर’ तसेच ‘वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगाव’ यांचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या कादंबरीचे ऑडीओ बुक ‘स्टोरी टेल’ तर्फे प्रसिद्ध झाले आहे. अविनाश कोल्हे यांनी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे चरित्र, भारताची फाळणी, गदर चळवळ ही पुस्तके इंग्रजीतून मराठीत भाषांतरीत केली आहेत. यांना अलीकडेच ‘कुसुमाग्रज प्रतिष्ठान’ची एक लाख रूपयांची अभ्यासवृत्तीदेखील जाहीर झाली आहे.

संमाभिरा

**कृष्णन गोपाळ नंदेला**

कृष्णन गोपाळ नंदेला हे डॉ. टी.के. टोपे कला आणि वाणिज्य रात्र महाविद्यालय, परळ,मुंबई येथे सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख असून शैक्षणिक क्षेत्रात गेली तेहतीस वर्षे कार्यरत आहेत. सध्या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणूनही पदभार सांभाळत आहेत. त्यांची विपुल प्रकाशनातर्फे सामाजिक शास्त्रावर एक आणि सूक्ष्म व समग्र अर्थशास्त्रावर आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मुंबई विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागासाठी त्यांनी अर्थशास्त्र विषयावरील पंधरा अभ्यास पुस्तकांचे सह-लेखन केले आहे. राज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आयोजित केलेल्या अनेक संमेलनामध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले आहेत तसेच ते प्रकाशितही झालेले आहेत. डॉ. टी.के. टोपे कला आणि वाणिज्य रात्र महाविद्यालयाच्या संकेत-स्थळावर त्यांनी अर्थशास्त्र विषयावरील अनेक इलेक्ट्रोनिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यांनी एमए-सामाजिक शास्त्र, एमए-अर्थशास्त्र, एमएलएस-श्रमशास्त्र या पदव्या प्राप्त केल्या असून अलीकडे त्यांना पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. कृष्णन नंदेला यांनी गांधीविचारांवर अनेक शोधनिबंधांचे लेखन केले असून या निबंधांचे प्रकाशन www.mkgandhi.org या संकेत-स्थळावर झालेले आहे.

**वासंती दामले**

वासंती दामले यांना मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागात २५ वर्षे अध्यापनाचा आणि मुंबई विद्यापीठाच्याच (आधी रशियन आणि सोव्हिएट अभ्यासकेंद्र असे नाव असणारे परंतु नंतर नामांतर झालेले) 'युरेशिअन अभ्यासकेंद्रा'त संशोधन सहयोगी म्हणून पाच वर्षांचा अनुभव आहे. तसेच मराठी भाषेत पुस्तके प्रकाशित करणाऱ्या आणि वाचन संस्कृतीचे संवर्धन करणाऱ्या *ग्रंथाली एक वाचक चळवळी*च्या उपक्रमांमधील त्या एक विश्वस्त असून सक्रिय सभासदही आहेत. शिवाय त्या वार्षिकांक प्रकाशित करणाऱ्या *स्त्रीउवाच* नियतकालिकाच्या एक सदस्य आहेत. २००५पासून त्या *लोकसत्ता* आणि *महाराष्ट्र टाईम्स* या दैनिकांमधून नियमितपणे स्तंभलेखन करतात, तर २०१०मध्ये त्यांनी *कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे चरित्रा*चे लेखन केले आहे. तर मधु लिमये यांच्या पुस्तकाचा वासंती दामले यांनी केलेला मराठी अनुवाद *धर्मांधता: राज्यसंस्थेवरील घोरसंकट (२०२१)* या नावाने प्रसिद्ध आहे.

**प्रदीप मोहिते**

प्रदीप मोहिते हे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर येथे सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या 'महाराष्ट्रातील मांग जातीच्या 'पारोषी' नामक संकेत बोलीवरील शोधनिबंधाची निवड,' डॉ. गणेश देवी यांच्या 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' या प्रकल्पामध्ये झाली आहे. सध्या अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्यावर व्यक्तिगत पातळीवर संशोधन सुरू आहे. खेड्यापाड्यांतून पथनाट्याच्या माध्यमाद्वारे फुले- शाहू-आंबेडकरी विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य सुरू आहे.

**दीपक बोरगावे**

दीपक बोरगावे हे १९७१ पासून इंग्रजी साहित्य आणि भाषा विषयाचे महाविद्यालयीन व पदव्युत्तर अध्यापन करीत आहेत. महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी (पुणे) येथून ते निवृत्त झाले आहेत. भाषांतर आणि संस्कृती या अभ्यासक्षेत्रात त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली असून त्यांनी पॅरिस आणि इंग्लंड येथील विद्यापीठांत संशोधननिबंध सादर केले आहेत. भाषांतर, उत्तरवसाहतिक, उत्तरआधुनिक साहित्य, भारतीय इंग्रजी साहित्य, संस्कृती अभ्यास तसेच भारतीय भाषांतून इंग्रजीत झालेली भाषांतरे, भाषांतरसमीक्षा अशा विविध विषयांवर त्यांनी संशोधनात्मक लेखन केले आहे. ब-बळीचा (राजन गवस), खाली जमीन वर आकाश (सुनिलकुमार लवटे) कुमारांचे कर्मवीर (द. ता. भोसले), झोत (रावसाहेब कसबे), इंग्रजीत अनुवाद आणि गुजरात फाईल्स (राणा अय्यूब), औरंगजेब (अलेक्स रदरफोर्ड) मराठीत अनुवाद यावर त्यांचे लेखन असून त्यांच्या कवितांचा हिंदीत अनुवाद असे विपुल लेखन प्रसिद्ध आहे. याशिवाय लवकरच त्यांचे मराठीतील दोन कवितासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

# संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना

'संभाषण' मासिकासाठी शोधनिबंध लिहिताना शोधनिबंधकाराने **In Text parenthetical Author-Date citation** या संदर्भ पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य आहे.

**In Text parenthetical Author-Date Citation** ही संदर्भ देण्याची अधिक सुटसुटीत पद्धत आहे. या पद्धतीनुसार प्रत्यक्ष लेखातील मजकुरामध्ये वा विवेचनामध्ये संदर्भांचे आधार देणे अभिप्रेत असते. या पद्धतीने संदर्भ देताना लेखकाचे आडनाव, संदर्भग्रंथाचे प्रकाशनवर्ष आणि उद्धृत संदर्भाचा पृष्ठ क्रमांक नोंदविणे आवश्यक असते.
उदाहरणार्थ,
(रेगे २००४ : ७५)
सदर संदर्भग्रंथाविषयीचे अन्य तपशील लेखाच्या शेवटी जोडलेल्या संदर्भांच्या यादीमध्ये समाविष्ट केले जातात.
उदाहरणार्थ,
रेगे, मे. पुं. (२००४) **:** *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह**,** मुंबई.

शोधनिबंधाच्या शेवटी संदर्भसाधने नमूद करताना मराठी आणि इंग्रजी भाषेतील संदर्भांची स्वतंत्र नोंद करावी. तसेच ही माहिती देताना ग्रंथ (स्वतंत्र, संपादित इत्यादी), नियतकालिक, वर्तमानपत्र, अप्रकाशित प्रबंध, प्रबंधिका, संकेतस्थळ आणि समाजमाध्यम हा क्रम पाळावा.

**संदर्भ देताना ग्रंथकाराच्या,/संपादकाच्या आडनावाने प्रारंभ करून आडनावानुक्रमे नोंद करणे आवश्यक आहे.**
उदाहरणार्थ,
मतकरी, रत्नाकर (१९८३) : *स्पर्श अमृताचा*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
मनोहर, श्याम (१९८३) : *हे ईश्वरराव...हे पुरुषोत्तमराव*..., पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

**एकाच लेखकाच्या एकाहून अधिक पुस्तकांचे संदर्भ येत असतील तर वर्षानुक्रम पाळावा.**
उदाहरणार्थ,
नेमाडे, भालचंद्र (१९८७) : *साहित्याची भाषा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद .
नेमाडे, भालचंद्र (१९९०) : *टीकास्वयंवर*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

**एका लेखकाच्या एकाच वर्षातील एकाहून अधिक ग्रंथांचा, लेखांचा संदर्भ येत असेल तर पुढीलप्रमाणे लिहावे.**

उदाहरणार्थ,

पाटील, गंगाधर (१९९१ अ) : 'चिन्हमीमांसा', *अनुष्टुभ*, मार्च –एप्रिल, पृ. ३-६.

पाटील, गंगाधर (१९९१ आ) : 'कथनमीमांसा', *अनुष्टुभ*, दिवाळी अंक, पृ. ८६ -१२७.

एकाच साधनाचा संदर्भ लागोपाठ येतो तेव्हा 'तत्रैव' शब्द वापरून पृष्ठ क्रमांक द्यावा. उदाहरणार्थ, लेखात एखाद्या पुस्तकाचा संदर्भ पहिल्यांदा येत असेल तर तो (मुक्तिबोध १९९७ : ३१) अशा पद्धतीने नोंदवावा. हाच संदर्भ सलग आल्यास (तत्रैव, पृ. ४९) असे लिहावे.

**लेखाच्या शेवटी देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या संदर्भसाधनांच्या नोंदींची प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. ही उदाहरणे देत असताना IN-TEXT-CITATION पद्धतीनुसार प्रत्यक्ष विवेचनात संदर्भ कसे द्यायचे यासंबंधीचे नमुनेही देण्यात आले आहेत.**

ग्रंथ (book)

**एक लेखक**

रेगे, मे. पुं. (२००४) : *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(रेगे २००४ : २५)

**दोन लेखक**

मालशे, मिलिंद व जोशी अशोक (२००७) : *आधुनिक समीक्षा सिद्धांत*, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(मालशे व जोशी २००७ : ७८)

**संपादक (एक)**

जोशी, महादेवशास्त्री (संपा.) (१९६२) : *भारतीय संस्कृतिकोश- खंड १*, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे.

**IN-TEXT-**CITATION

(जोशी १९६२ : ६०)

**संपादक (दोन)**

भोळे, भा. ल. व बेडकिहाळ किशोर (संपा.) (२००३) : *बदलता महाराष्ट्र*, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

**IN-TEXT-**CITATION

(भोळे व बेडकिहाळ २००३ : ३६)

**संपादक (दोनापेक्षा अधिक असल्यास)**

नाईक, राजीव व इतर (संपा.) (१९८८) : *रंङ्गनायक,* आविष्कार प्रकाशन, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक व इतर १९८८ : ५९)

**संपादित ग्रंथातील लेखाचा संदर्भ**

केळकर, अशोक (१९८१) : 'भाषावैज्ञानिक संशोधनाच्या नव्या दिशा', *भाषा व साहित्य : संशोधन,* वसंत जोशी (संपा.) , महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृ. ४७-६८.

IN-TEXT-**CITATION**

(केळकर १९८१ : ५०)

**अनुवादित**

आंबेडकर, बाबासाहेब (२००५) : दु. आ., *जातिव्यवस्थेचे विध्वंसन*, गौतम शिंदे (अनु.), सुगावा प्रकाशन, पुणे.

IN-TEXT-**CITATION**

(आंबेडकर २००५ : ३८)

संज्ञापित

**संपादित आणि अनुवादित ग्रंथ**

बापट, पु. वि. (संपा.) (२००१) : *धम्मपद,* पु. मं. लाड (अनु.), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(बापट २००१ : १५)

नियतकालिकातील लेख

चौसाळकर, अशोक (२०१९) : 'चिनी क्रांतीची ७० वर्षे', *समाज प्रबोधन पत्रिका,* ऑक्टोबर-डिसेंबर, पृ. ३-११.

पळशीकर, सुहास (२०२०) : 'नागरिकत्वविषयक दुरुस्तीचे वास्तव', *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. १८ -२४.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(चौसाळकर २०१९ : ७)

(पळशीकर २०२० : २१)

**वर्तमानपत्रातील लेख**

नाडकर्णी, कमलाकर (२०२०) : 'होय, बालरंगभूमीही 'प्रायोगिक' होती!', *लोकसत्ता*, २४ मे, पृ. १२.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाडकर्णी २०२० : १२)

**ग्रंथपरिचय**

फडके, अनंत (२०२०) : 'विकासनीतीची कठोर चिकित्सा (पूर्वार्ध)' अच्युत गोडबोले यांच्या *अन्वर्थ -विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर?* या पुस्तकाचे परीक्षण, *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. ४६-४९.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

संज्ञापित

IN-TEXT-**CITATION**

(फडके २०२० : ४८)

**मुलाखत**

केतकर, कुमार (२०१७) : 'मार्क्स : प्रभाव आणि परिणाम' शेखर देशमुख (मुलाखतकार), *साधना*, मे, पृ. २२-२३.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(केतकर २०१७ : २२)

**भाषण**

दरेकर, प्रविण (२०१४) : 'चांगल्या शैक्षणिक धोरणाची राज्याला आवश्यकता आहे!', *विधिमंडळातील राजगर्जना,* नवता प्रकाशन, मुंबई, पृ. ५४-५७.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(दरेकर २०१४ : ५५)

**अप्रकाशित प्रबंध आणि प्रबंधिका**

नाईक, कृष्णा बाबली (२०१६) : 'रत्नाकर मतकरींच्या गूढकथा : स्वरूप आणि अभ्यास', अप्रकाशित प्रबंध, मुंबई विद्यापीठ.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक २०१६ : ८७)

संक्रमित

## वेबसाईट संदर्भ


**संकेतस्थळावरील परीक्षण**

आळवेकर, एकनाथ (२०१८) : 'रिंगाण : उत्क्रांतीची नवी दिशा देणारी कादंबरी', पीडीएफ.

**http://vivekresearchjournal.org/current_issue.html**

(संकेतस्थळाला भेट २७ फेब्रुवारी २०१९)

IN-TEXT-**CITATION**

(आळवेकर २०१८)

**संकेतस्थळावरील लेख**

कुलकर्णी, हेरंब (२०२०) : 'शिक्षणाची कक्षा आणि कक्षेचे शिक्षण'

**http://herambkulkarniarticles.blogspot.com/2020/01/blog-post_4html?m=1**

(संकेतस्थळाला भेट २८ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(कुलकर्णी २०२०)

**संकेतस्थळावरील पुस्तक**

मनोहर, यशवंत (२०१२) : *विचारसत्ता*, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.

**http://yashwantmanohar.com/pdf/Bauddha%20Sanskruti%20Ani%20Sah**

**itya.pdf**

(संकेतस्थळाला भेट १५ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(मनोहर २०१२)

**संकेतस्थळावरील वर्तमानपत्र**

हेमाडे, श्रीनिवास (२०२०) : 'परीक्षा - विद्यार्थ्यांची आणि अस्तित्वाची'

**https:// www.esakal.com/sampadakiy/shrinivas-hemade-article-about-student-299349**

(संकेतस्थळाला भेट ३० मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(हेमाडे २०२०)

**समाजमाध्यम**

बोरगावे, दीपक (२०२०) : ‘रोमान याकोबसन आणि भाषांतर अभ्यास’

http://www.facebook.com/story.php?story_fbid=18731

संज्ञापित

संभाषित

अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय,
मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस,
विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.

**© ‘संभाषित’ या तज्ज्ञपरीक्षित संशोधन-पत्रिकेतील (Peer-Reviewed Research Journal) कोणत्याही मजकुराचे पुनर्मुद्रण पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.**

**लेख पुढील ई-पत्त्यावर (Email) पाठवावेत.**
**editorinchief.sambhashit@mu.ac.in** with a cc to
**editor.sambhashit@mu.ac.in**